

गट्टी फू
The Pinky Promise

लेखक : डॉ सैलेश राव

रेखाटन: किमाया राव, रोक्सेन चॅपेल आणि निहारिका देसीराजू



प्रस्तावना ज्यूडी कारमन

काही प्रशंसा...

गट्टी फू (The Pinky Promise) पुस्तकाबद्दल

“पर्यावरण बदलाचे सत्य कळताच अत्यंत असहाय्यतेची भावना निर्माण होते. परंतु गट्टी फू - '*The Pinky Promise*' हे पुस्तक आपल्याला आशेचा किरण दाखवते व आपल्यातील निरागसता, माणुसकी आणि ताकद शोधायला मदत करते, जे आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे.”

- जॉन आणि ओशियन रॉबिन्स,

फूड रेवलूशन नेटवर्क चे संस्थापक आणि प्रमुख

“हे पुस्तक दाखवून देतं की मोठ्यांनी ही पाटी कोरी करून शिकलं, तर सध्याच्या पर्यावरणीय आपत्तीवरील उपाय लहान मुलांना ही समजतील इतके सोपे आहेत.”

- किगन कुहन,

कौस्पिरसी आणि व्हॉट द हेल्थ चे सहदिग्दर्शक

“ह्या पुस्तकातून डॉ सैलेश राव यांनी त्यांच्या नातीच्या म्हणजे किमायाच्या उदाहरणावरून दाखवून दिले की सध्याची पर्यावरणाची स्थिती सुधारण्यासाठी आपल्याला निरागस माणुसकीचे मन हवे आणि आपण त्या मनाचे ऐकायला हवे. आपल्याला केवळ निसर्गाचे ऐकायचे आहे आणि ह्या जगाला वाचवायचे आहे. माणसाने माणसाचे अन्न खावे एवढीच साधी अपेक्षा आहे आपल्याकडून आणि इतकं आपण नक्कीच करू शकतो, नाही का?”

- ग्लेन मर्झर,

फ़ूड इज़ क्लाइमेट आणि ओन यौर हेल्थ चे लेखक

“लहान मोठ्या सर्वांनीच हे पुस्तक आवर्जून वाचायला हवे. विशेषतः ते व्यक्ती ज्यांना आपल्या पुढच्या पिढीसाठी जगण्यास योग्य असे वातावरण हवे आहे, परंतु शुद्ध शाकाहारी भोजन व अहिंसक (Vegan) जीवनशैलीचे महत्त्व अजूनही पटलेले नाही.”

- जॉन मॅकडुगल, एम. डी.,
सुप्रसिद्ध लेखक आणि मॅकडुगल प्रोग्राम चे संस्थापक

"सैलेश रावांची समानता आणि भूतदया वरील संज्ञा म्हणजे आताच्या झोपलेल्या जगाला जागं करण्याचा उपाय आहे. अत्यंत सोप्या शब्दात डॉ. रावांनी हे समजवले आहे की जगाला ताबडतोब स्वतःला बदलण्याची गरज आहे. अतिशय साध्या बदलाने आपण सर्व काही ठीक करू शकू असा द्रुढ विश्वास ते आपल्याला दाखवतात."

- जेन वेलेज-मिचेल,
पत्रकार आणि सुप्रसिद्ध लेखिका संस्थापक अनचेंड टी.वी.

"कल्पना करा, सैलेश रावांनी पहिल्यांदा किमायाला हातात घेतले तेव्हा त्यांना जे आकलन झाले तसे आता सगळ्या जगाला झालेले असते तर? आपल्यात एवढी ताकद आहे की आपण वसुधैव कुटंबकम् हे खरं करू शकतो. करुणा भाव आणि धैर्य एकवटण्याची गरज आहे जेणेकरून आपण ह्या पृथ्वीला पूर्ववत करू शकू आणि सर्वजण मिळून मिसळून राहू शकू. अश्या सुंदर जीवनाचे अभिवचन हे पुस्तक आपल्याला देते."

- झोई वेइल,
इंस्टिट्यूट ऑफ ह्यूमेन एजुकेशन च्या अध्यापक आणि संस्थापक

"आजोबांचं प्रेम, हुशारी आणि एक दयाळू व निरोगी जग बनवण्याची त्यांची निष्ठा सांगणारं हे पुस्तक आहे. किमायाने काढलेली मार्मिक चित्रे म्हणजे एक दया आणि क्षमेने भरलेलं जग निर्माण करण्यासाठी तयार झालेल्या छोट्या कार्यकर्त्यांचे प्रतीक आहे. डॉ सैलेश राव आणि त्यांची नात किमाया जगातील सर्वच बांधवांना जागरूक करत आहेत. आपल्या खाद्य संस्कृतीचे परिणाम काय आहेत ते जाणून घेऊन आपण त्यासाठी ताबडतोब एकत्र येऊन अहिंसा तत्त्वावर हे जग उभं करायला हवे आहे. मला

हे पुस्तक वाचून अतीव आनंद मिळाला आणि मला कल्पना आहे की हे पुस्तक वाचकांच्या हृदयाला भिडणारं असून सर्व वयातील व प्रेरणादायी आहे.”

- डॉ शेली ऑस्ट्रॉफ, सह-निर्माता, कोड्स फॉर हेल्दी अर्थ

“गट्टी फू - '*The Pinky Promise*' हे पुस्तक म्हणजे अतिशय प्रेरणादायी आणि सुंदर गोष्टी तसेच वस्तुस्थिती सांगणारे आहे. अतिशय साध्या गोष्टी आणि मार्मिक उदाहरणे आहेत पण त्यांचा गर्भितार्थ अतिशय महत्वाचा आहे मुख्यत्वेकरून आपल्या आताच्या ह्या सद्य जीवनामध्ये तर नक्कीच. स्तुत्य बदलाची ही मशालच आहे जणु काही.”

- रीबेका अॅलन, सर्टिफाइड क्लाइमेट हीलर,
आणि इम्यून बूस्टर्स च्या सह-संस्थापक

“पैगंबर यशाया यांनी पृथ्वीवर भविष्यात शांती आणि सुंदर जनजीवनाच्या काळाचा उल्लेख केला, ते हे ही म्हणाले की यावेळी, ‘एक लहान मूल आपले नेतृत्व करेल’. डॉ. सैलेश रावांच्या ह्या पुस्तकातून मला ती भविष्यवाणी हळू हळू आकार घेत असल्याचे जाणवत आहे. पेशाने सिस्टम इंजीनियर असणाऱ्या डॉ. रावांना त्यांच्या नातीने प्रेरणा दिली आणि ह्या पृथ्वीचे पर्यावरण विषयक समस्या सोडवण्यासाठी तीच त्यांची गुरु झाली.
गट्टी फू - '*The Pinky Promise*' ह्या पुस्तकात आपल्याला हे गुरु शिष्य भेटतात, ते आपल्याला हे शिकवतात की पृथ्वी वाचवणे हे इतर कुठल्याही राजकीय, संस्था, सभांपेक्षा महत्त्वाचे आहे आणि तेवढ्यापुरते सीमित नाही तर इतर सर्व प्राणिमात्रांविषयी प्रेम आणि करुणाभाव आहे. आपल्यात जेव्हा हे प्रेम आणि करुणा निर्माण होईल तेव्हाच आपण ह्या पृथ्वीला नाशापासून वाचवू शकतो.”

-व्हिक्टोरिया मोरन,
‘द गुड कर्मा डाइट’ची लेखिका आणि कम्पैशन कंसोर्टियम च्या सह-संस्थापक

डॉ. सैलेश रावांचे हे प्रामाणिक आणि धैर्य दर्शवणारे पुस्तक आहे. सर्व पालकांना आणि त्यांच्या आजी आजोबांना हे पुस्तक सांगते आहे की एका लहान मुलांसारखे विचार करून पहा आणि परंपरांमध्ये अडकून ना पडता ह्या नव्या पिढीला आपले मार्गदर्शक बनवा.

- सायमन व्हॅली, लेखक
डिअर इंडी : ए फादरस प्ली फॉर क्लाइमेट एक्शन

डॉ रावांचे हे महत्वाकांशी आणि ज्ञान वाढवणारे पुस्तक त्या सर्वांनी वाचले पाहिजे जे ह्या वसुंधरे वर प्रेम करतात.

- कीप अंडरसन, सह-दिग्दर्शक - व्हॉट द हेल्थ,
Cowspiracy आणि Seaspiracy

गट्टी फू - '*The Pinky Promise*' हे पुस्तक आपल्याला आठवण करून देते की उज्ज्वल भविष्याचा उत्तम मार्ग म्हणजे अश्या लोकांसोबत जुडणे ज्यांना तो मार्ग माहीत आहे.

- ऍलेक्स लॉकवूड ,
बाफता पुरस्कार विजेते दिग्दर्शक - ७३ Cows

हृदयस्पर्शी, करुणामय पुस्तक. सैलेश राव वाचकांना त्यांच्या आणि त्यांच्या नातीच्या गोष्टी सांगतात, त्यांनी तिला दिलेली तीन अभिवचने सांगतात आणि पर्यावरण बदलाविषयी ह्या पुस्तकातून सांगत आहेत. त्यांची ही आत्मकथा जीवनाविषयी सत्य शिकवते आहे, निरपेक्ष प्रेम शिकवते आहे आणि अनावश्यक रुढींना बंद करण्याचे सांगत आहे.

- एरिन एपल, स्कूल ऑफ सस्टेनेबिलिटी, ऍरिझोना स्टेट युनिव्हर्सटी

सैलेश राव हे कायमच आम्हाला एक सिस्टम इंजीनियर म्हणून आणि त्यांच्या शैक्षणिक तसेच तंत्रज्ञानातील कुशलते बद्दल माहीत आहेत. अतिशय कठीण विषयाला सोप्पं करून सांगण्याची त्यांची कला आहे आणि ह्या गट्टी फू पुस्तकात देखील त्यांनी हेच केले आहे. ह्या पुस्तकात ते आपल्या नातीच्या माध्यमातून अतिशय महत्वाचे विषयांवर बोलले आहेत. किमायासारख्या नव्या पिढीच्या माध्यमाने ह्या वसुंधरेचं रक्षण करण्याबद्दल सैलेश राव अगदी सहज बोलत आहेत. गट्टी फु ह्या पुस्तकाचा वाचकांवर नक्कीच खोलवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

- गुरु पांगल, उपाध्यक्ष / व्यवस्थापक गूगल क्लाउड

ह्या आकर्षक आणि उद्रेकात्मक पुस्तकात लेखक सैलेश राव मोठ्या माणसांच्या अश्या एका गुणांचे दर्शन घडवतात जिथे एक प्रौढ व्यक्ती एका लहान मुलीच्या सहज बुद्धी वर विश्वास ठेऊन तिला काही अभिवचने देतात आणि ती पूर्ण करण्यासाठी जिवाचे रान करतात. आजोबा आणि नातीच्या ह्या वचनबद्ध प्रवासात वाचक ही. त्यांच्यासोबत चालू लागतात. ह्यातील गोष्टी आपल्याला दाखवतात की एक निश्चयात्मक बुद्धी आपोआपच आपल्याला त्यातून कसे तारून नेते आणि आपल्याकडून आश्चर्यकारक कार्य घडवून घेते.

- सुस्सेन मॅकऍलिस्टेर, पी. एच. डी.
पाऊ प्रोजेक्ट च्या सहसंचालक आणि
वीगन स्पिरिचुअलिटी ग्रुप ऑफ फिलाडेल्फिया च्या आयोजक

डॉ राव माझ्यासाठी दुसरे गांधी आहेत, माझे गुरु आहेत. डॉ राव कठीण गोष्टींना ज्या प्रकारे सोपं करून सांगतात आणि ह्या जगाला सुंदर बनवण्यासाठी आपण काय केले पाहिजे ते सांगतात हे मला खूप आवडले. त्यांनी त्यांच्या नातीला दिलेली तीन वचने आपल्या सगळ्यांसाठीच प्रेरणादायी ठरली पाहिजेत जेणेकरून आपल्या पुढच्या पिढीला आपण एक सुद्रुढ आणि सुंदर जग खुलं करून देऊ शकू.

- डॉली व्यास – आहुजा,
‘द लैंड ऑफ अहिंसा’ या पुरस्कार विजेत्या माहितीपटाच्या निर्माता

भविष्याचा वेध घेण्याचा उत्तम मार्ग म्हणजे स्वतःच ते घडवणे.
गट्टी फू - '*The Pinky Promise*' हे पुस्तक आपल्याला सत्य परिस्थितीची जाणीव करून देते आणि रोजच्याच गोष्टीला नव्याने पाहण्याचा दृष्टिकोन देते.

ह्या निराशाजनक आणि एकलकोंड्या जीवनाचा अंत हा शांततेत आणि सुखद असू शकतो पण तेव्हाच जेव्हा आपण त्या नवीन जीवनाचे स्वागत करायला तयार असू तेव्हा. डॉ रावांसारखे तुमच्याकडे कुणी मूल किंवा नातवंड नसेल तर तुम्ही स्वतःलाच अर्थपूर्ण आणि सुंदर जीवनाचे वचन द्या. हे पुस्तक सांगते की त्यासाठी अतिशय सोपा आणि सरळ मार्ग आहे, मग अडलय कुठे ?


- डॉ कॅमीला पेरसेलो,
फूड फॉर थॉट: प्लॅनेटरी हीलिंग बिगिन ऑन अवर प्लैनेट च्या लेखिका

गट्टी फू - '*The Pinky Promise*' पुस्तकातून आपल्याला मानवजाती पुढे असलेले यक्ष प्रश्न दिसतात. प्रेम, करुणा आणि आशावाद ह्यातून ते प्रश्न सहज सुटू शकतात. हे पुस्तक खरच खूप सुंदर आहे आणि प्रेरणादायी आहे.

- डॉ. नील बर्नार्ड, एम.डी. एफ. ए. सी. सी.,
फिजिशियन कमिटी फॉर रेस्पोंसिबल मेडिसिन चे अध्यक्ष

गट्टी फू

The Pinky Promise



लेखक : डॉ सैलेश राव


रेखाटन: किमाया राव, रोक्सेन चॅपेल
आणि निहारिका देसीराजू

ISBN: 979-8-89686-673-2

“जिज्ञासू माणसे
लहान मुलांसारखे
पाहतात आणि ऐकतात”

- *लाव त्झू*

साहित्य: शेंगा, भाज्या, धान्ये,
औषधी वनस्पती, हळद, प्रेम भाव



युनिटी खिचडी

अनुक्रमणिका

लेखक आणि चित्रकारांविषयी

सैलेश राव, किमाया राव, रॉक्सन चॅपेल आणि
निहारिका देसीराजू

सैलेश राव हे 'क्लाइमेट हीलर्स' चे सहसंस्थापक आणि कार्यकारी संचालक आहेत. ह्या संस्थेचे उद्दिष्ट केवळ पृथ्वी वरील पर्यावरण सुधारणे एवढेच आहे. पेशाने ते सिस्टम इंजीनियर आहेत आणि आता ह्यूमन, अर्थ एंड एनिमल लिबरेशन चे कार्यकर्ते शिवाय एक पिता आणि २०१० पासून एक उत्कृष्ट आजोबा आहेत. गट्टी फू - '*The Pinky Promise*' हे पुस्तक त्यांच्या वचनांची उजळणी आहे जी त्यांनी किमायाला दिली आहेत, का आणि कसे जगातील सर्वाअधिक लोकं अहिंसक (Vegan) होतील, ते ही २०२६ जेव्हा किमाया १६ वर्षांची होईल तोपर्यंत, जेणेकरून लोकं तिच्या नातेवाईकांना म्हणजेच प्राण्यांना खाणं बंद करतील. सैलेश रावांना असा विश्वास आहे की जग बदलेल आणि त्यांचं अभिवचन पुरे करण्यास त्यांना मदत करेल. केवळ नैतिक बाबींसाठी नव्हे तर पर्यावरणाच्या गरजा समजून देखील जग अहिंसक होईल अशी त्यांना आशा वाटते. त्यांनी क्लाइमेट बाथटब मॉडल तयार केले आहे. हे मॉडल दाखवते की ह्या पृथ्वीची भरभराट व्हावी आणि पर्यावरण सुधारावे असे जर आपल्याला वाटत असेल तर २०२६ च्या आत जास्तीत जास्त समाजाने अहिंसक (Vegan) खाद्य संस्कृती अमलात आणणे अत्यंत गरजेचे आहे.

हे पुस्तक लिहतेवेळी, किमाया राव इयत्ता सहावी त शिकत आहे. ह्या पुस्तकातील बरेचसे चित्र संदर्भ हे किमायाने काढलेले आहेत. किमायाला कला, क्रीडा ह्यांची आवड असून आपल्या मित्रपरिवारासोबत तसेच घरच्यांसोबत वेळ घालवण्यात तिला आनंद मिळतो. किमायाची आई रॉक्सन चॅपेल ह्यांनी ह्या पुस्तकातील चार रेखाटने स्वतः केलेली आहेत शिवाय ह्या पुस्तकाचे मुखपृष्ठ त्यांनी रेखाटले आहे. 'इच्छापूर्ती झाड' चे रेखाटन निहारिका देसीराजू ह्यांनी केलेलं आहे.

“जेव्हा आपण आपल्यातील लहान मुलाला कायम जागं ठेऊन ह्या निसर्गाकडे सदैव विस्मयतेने बघत राहू, तेव्हा आपण आपल्या मातृभूमीवर खरे प्रेम करू शकू आणि तिचा झालेला ह्रास भरून काढू शकू.“

-ज्यूडी मॅकॉय कारमॅन

प्रस्तावना १

ज्यूडी मॅकॉय कारमॅन

ही एका आजोबांच्या निष्ठेची गोष्ट आहे, सैलेश राव; आपल्या नातीकडून मिळालेल्या शहाणेपणाची ही गोष्ट आहे आणि आजोबांनी नातीला दिलेल्या वचनांची गोष्ट आहे. आपल्याला जमेल तसे ह्या जगाला वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्याचे वचन. सैलेश रावांनी दिलेल्या ह्या वचनाने मला जॉन डेनवर ह्यांची एक कविता आठवते.

'रायम्स आणि रिझन्स' ह्या आपल्या कवितेत ते म्हणतात,

"आपण लहान मुलांचे शहाणपण घ्यावे आणि फुलांचे विनयशीलपण आणि डौलदारपण घ्यावे..

कारण मुलांचे व फुलांचे हसणे आणि प्रेमळ वावरणे मळभ दूर करून जाते.

इंद्रधनुच्या रंगांसारखे ही मुले म्हणजे शाश्वत भविष्य आणि सुखद वर्तमान आहेत,

शहर पसरते आहे आणि फुले भवती विखरू लागली आहेत,

सूर्य हळू हळू लपत आहे आणि सर्वत्र सागराहूनही अधिक गारवा वाटतो आहे,

पर्वत आणि सर्व परिसर आपल्याला सांगत आहे..

ह्या मुलांचा निरागसपणा आणि विश्वास आपल्याला मुक्तछंद करते..
मुलांचे आणि फुलांचे हसणे आणि प्रेमळ वावरणे मळभ ही दूर करून जाते...
हे माझे गाणे म्हणजे एक प्रार्थना आहे, ज्यांना हे पटत नाही त्यांनी माझ्या निकट उभे रहा आपण ह्याहून चांगला शिक्षक मिळतो का ते पाहत रहा.."

आपल्या सभोवती होणारा ह्रास, पशुपालन-मस्त्यपालन मुळे होणारी समुद्राची हानी तसेच वन्य जीवनाचा ह्रास, हवेचे प्रदूषण, कुपोषण आणि वाढती रोगराई तुम्हाला दिसत असेल तर ह्या पुस्तकातील आजोबांचे प्रेम आणि नातीच्या निरागस आणि नैसर्गिक शिकवण अमलात आणण्याची त्यांची इच्छा तुम्हाला ह्या सद्य परिस्थितीत काय करायला हवे हे नक्की सांगेल.

हे पुस्तक खरोखरच एक पवित्र आणि शक्तिशाली प्रार्थना आहे जे सांगत आहे की 'या आपण सर्वांनी मिळून उपाय शोधूया'. आपण माणूस म्हणून आत्तापर्यंत हे समजत होतो की आपण कुणावरही अधिकार गाजवू शकतो, काहीही आणि कितीही वापरू शकतो आणि हवे त्याला मारू शकतो, पण सैलेश रावांनी ह्या पुस्तकातून माणसाच्या ह्या स्वभावाला विरोध करून स्वतः मधे आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आपल्याला विनंती केली आहे.

आपण मोकळ्या मनाने आणि विशुद्ध प्रेमाने विचार केला तर आपल्यालाही किमायासारखेच सर्व प्राणीमात्र आपले बांधव आहेत असे वाटेल आणि मग आपण आपल्याच बांधवांन साहजिकच मारून खाणार नाही. माणसाने अहिंसक होणे आवश्यक आहे. कुठल्याही जीवावर आपला अधिकार नाही हे माणसाने पक्के ओळखले पाहिजे. आपल्याला देवाने इतर जीवांना मारण्यासाठी ह्या इहलोकावर पाठवलेले नाही तर याउलट 'जीवो जीवस्य जीवनम्' हे खरे करून देण्यासाठी पाठवले आहे. 'जगा आणि जगू द्या' हे साधे तत्व आहे. जेव्हा एखाद्या लहान मुलांसारखे आपण निसर्गाकडे बघू तेव्हाच आपण 'वसुधैव कुटंबकम' हे जगू शकू.

आपण ह्या पृथ्वीवरील सर्वच मुलांशी गट्टी फू करूयात की ह्या पृथ्वीतलावरील सर्वच प्राणी हे जीवन जगतील आणि सर्वच प्राणी हे मुक्त असतील. सर्व प्राणी स्वधर्माचरण करतील.

टिप :

अहिंसा हा एक संस्कृत शब्द आहे. त्याचा गर्भितार्थ म्हणजे सर्व प्राणिमात्रांविषयी प्रेम, दया, करुणा वाटणे. महात्मा गांधी देखील अहिंसा तत्वावर चालणारे होते. त्यांची अहिंसेची शिकवण सगळ्या जगाला प्रेरणादायी ठरली.

विज्ञान माणसाला 'होमो सेपियन' असे म्हणतो पण खरे तर आपण 'होमो अहिंसक' आहोत. क्लाइमेट हीलर्स संस्थेच्या दृष्टीने ह्याचा अर्थ असा आहे की 'जसे सुरवंटाचे फुलपाखरू होते पण प्रत्येक फुलपाखराचा रंग वेगळा, वैशिष्ट्य वेगळे तसेच माणसाचे देखील आहे. सर्वांनी एकत्र यावे आणि स्वतःला सुरवंटातून काढून फुलपाखरू बनवावे परंतु प्रत्येक माणसाचे वैशिष्ट्य वेगळे असेल, त्या वैशिष्ट्यासकट माणसाने पृथ्वीला सुंदर बनवावे. हे फुलपाखरू होणे म्हणजेच होमो अहिंसक'

- जुडी मॅकाय कार्मन, एम ए

(होमो अहिंसा आणि पीस तो ऑल बीइंग्स चे लेखक)

(peacetoallbeings.com);

Interfaith Vegan Coalition (idausa.org)

प्रस्तावना 2

माझी नात किमाया माझ्या आयुष्यात आली आणि तिने आमचे आयुष्यच बदलून टाकले, ह्याला आता साधारण १२ वर्षे होऊन गेली. मला ह्या बद्दल लिहायचे होते पण सुरत मध्ये असताना मला २०२२ मध्ये पोटाचा विकार झाला आणि मी कुठेही न फिरता हॉटेल वर होतो तेव्हा मला खरा वेळ मिळाला. त्यावेळी डॉली व्यास ह्यांचे 'द लैंड ऑफ अहिंसा' ह्या पारितोषिक जिंकलेल्या लघुचित्रपटाचे आम्ही प्रचार करत होतो. पण मी आजारी पडल्यामुळे मला पुढे माझ्या सहकाऱ्यांसोबत जाता आले नाही. आजारपणातून बरा होत असताना मी लिहायला सुरवात केली. किमाया माझ्या आयुष्यात आल्यानंतरच्या सहा वर्षांचा इतिहास. ह्या पुस्तकाचे शब्द माझ्या हातून अक्षरशः झपझप पडत गेले आणि एका आठवड्यातच मी ते लिहून पूर्ण केले. मला खरच वाटलं नव्हतं की ह्या पुस्तकाचे बारा धडे म्हणजे माणसाने 'होमो सेपियान' पासून 'होमो अहिंसक' होण्यासाठीचे बारा अध्याय असतील. पर्यावरण घटक समाजापासून ते पर्यावरण पूरक समाजाकडे जाणाऱ्या मानवजातीचे.

होमो अहिंसक बनण्यासाठीचे १२ अध्याय पुढीलप्रमाणे :

अध्याय १: मान्य करा की आपण दुर्लक्ष केल्यामुळे आपले जीवन आपल्या हाताबाहेर चालले आहे आणि ते सावरणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. एखाद्या व्यसनमुक्ती कार्यक्रमाच्या देखील १२ पायऱ्या असतात.

पहिली पायरी म्हणजे हे मान्य करणे की आपल्याला जे माहीत आहे ते माहितीच्या सागरा मधला एक थेंब आहे आणि जे माहीत आहे ते देखील सत्य आहे ह्याची शाश्वती नाही.

अध्याय २: विश्वास ठेवा की लहान मुले आपल्याला अविवेकाकडून विवेकी बुद्धी कडे नेऊ शकतात.
आपल्या डोळ्यांवरची झापडं जेव्हा उघडतील आणि आपण जेव्हा जागतिक औद्योगिक विकासाचे सत्य पाहू शकू तेव्हा आपल्या लक्षात येईल की आपण जसे वागतोय तसे करण्यासाठी खरतर आपल्यावर दबाव आणला जात आहे. मुलतः आपण इतके अविवेकी नाही आहोत. अश्या वेळेस लहान मुलांबरोबर वेळ घालवावा आणि स्वतःला पुन्हा शोधावे कारण लहान मुले त्या बलवान अविवेकी बुद्धीने अजून जखडलेले नसतात.

अध्याय ३: आपल्या इच्छाशक्तीला लहान मुलांकडे सोपवा आणि त्यांच्या कडून त्या इच्छाशक्तीचा वापर कसा करावा हे शिका.
नुसतं मुलांबरोबर खेळून उपयोग नाही तर त्यांच्यासोबत गुरु शिष्याचं नातं निर्माण होऊ दे, जिथे मुलं आपले गुरु आहेत आणि आपण त्यांचे शिष्य.

अध्याय ४: सध्य जीवनातले मर्यादित खेळ थांबवा जिथे एक जण जिंकतो आणि बाकी सगळे हरलेले असतात.
आजकाल सगळेच जण 'ऑनलाइन शॉपिंग', 'इंस्टेंट फूड' च्या खेळाचे गडी आहेत. लाखो लोकं हे खेळतात, ह्यात गेम्स बनवणारा करोडो कमवतो आणि खेळणारा म्हणजे 'आपण' खूप काही गमावतो. पर्यावरण पूरक गोष्टींकडे वळायचं असेल तर ह्या इंस्टेंट आणि तात्पुरत्या गोष्टींचा खेळ थांबवा आणि विवेकी बुद्धीने अश्या खेळात सहभागी व्हा ज्यात तुम्ही जिंकाल आणि तो आनंद चिरकाल असेल.

अध्याय ५: आत्तापर्यंत आपण ऐकत असलेल्या आणि सांगत असलेल्या सर्व कथा किंवा पुराण कथा रूपांतरीत करायची वेळ आली आहे.

पुराण कथा किंवा इतर कथा ह्या माणसांना एकत्रित आणतात. त्यांना ह्या कथा एकमेकांशी बांधून ठेवतात कारण सर्व जण ह्या कथांवर सारखाच विश्वास ठेवतात. आपण सांगत असलेल्या किंवा ऐकत असलेल्या कथा हिंसक आहेत, आणि त्यामुळे साहजिकच लोकं त्यापासून बचाव करण्यासाठी देवाचा धावा करतात. आपल्या बालकथा देखील अशाच आहेत, ज्यात मुलांना खाणारी चेटकीण असते किंवा मुलांना मारणारा कुणीतरी राक्षस असतो. ऐकून मळमळेल अशाच कथा.

अध्याय ६: जाणून घ्या की आपल्या समस्यांवरील उपाय हा फारसा कठीण नाहीये.

रॉबर्ट फुलघुम ह्यांच्या पुस्तकातून मी शिकलो की, आपल्या घट्ट बनलेल्या समस्यांवरील उपाय हा समजून घेण्यास अगदी सोपा असू शकतो. पण तो कठीण वाटतो कारण आपण आपला हेका सोडायला तयार नसतो. पाटी कोरी करून जर आपण प्रयत्न केला तर सहज जमू शकते.

अध्याय ७: आपली चूक सुधारण्या कडे आपला कल असावा. चुकीच्या गोष्टींचा आदर करण्याकडे नव्हे.

ह्या मानव केंद्रवादी संस्कृतीमध्ये असा दृष्टिकोन आहे की निसर्गात माणूस हाच एक नैतिक आहे आणि उरलेले सगळे एकतर शोषण करण्यायोग्य प्राणी आहेत आणि माणसाने हवे तसे वापरण्या साठीच्या वस्तूच आहेत. हे सर्वार्थाने पर्यावरण घातक आहे ह्या उलट सर्व प्राणिमात्रांना समान वागणूक हे पर्यावरण पूरक असेल.

अध्याय ८: आपण आता उच्चतम पोहचून पुन्हा आपण होतो तसे होण्याच्या मार्गावर आहोत.
हे ओळखा की आता आपण आपल्या मूळ स्वभावाकडे चाललो आहोत, जितक्या लवकर तुम्ही हे समजून घ्याल तितक्या लवकर आपल्यातला करुणा भाव जागरुक होईल आणि आपल्यातील सौहार्द टिकेल.

अध्याय ९: समजून घ्या की आपण ह्या जगात फक्त कठपुतळे आहोत ज्यांची दोरी त्या भगवंताच्या हातात आहे.

समता प्रस्थापित करण्याच्या ह्या प्रवासात आपल्याला हा विश्वास उपयोगी पडेल की आपण एका स्वत:पेक्षा मोठ्या समाजाचा भाग आहोत आणि मानवजातीचे कल्याण हे कुणा एकाच्या कल्याणापेक्षा मोठे आणि महत्त्वाचे आहे.

अध्याय १०: आपल्याला निसर्गाकडून मिळत असलेल्या गोष्टींचा नम्रतेने आणि आदराने स्वीकार करा.
स्वत:ला ओळखण्याच्या ह्या प्रवासात आपल्या सर्वांनाच एक वैशिष्ट्य देवाने दिले आहे जे आपण आपल्या सोबत चाललेल्या इतर जीवन प्रवाश्यांना मदत करण्यासाठी वापरू शकतो. आपल्याकडे नसलेल्या गोष्टींसाठी रडण्याची ही वेळ नसून असलेल्या गोष्टींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची वेळ आहे.


अध्याय ११: वसुधैव कुटंबकम असे समजून निसर्गाने आपल्याला दिलेले दान इतरां सोबत वाटा.

एक जुनी आफ्रिकन म्हण आहे, स्वतः कडे असलेले जास्तीचे अन्न साठवण्याची योग्य जागा म्हणजे दुसऱ्याचे पोट. ह्या पर्यावरणीय आणीबाणीच्या काळात स्वतः सगळे साठवून त्याभोवती कुंपण घालून बसणे हे पुढे येणाऱ्या आपत्तीला आमंत्रण दिल्यासारखे आहे. ह्या स्वतः च्या परिवर्तनात सगळे उडी घेणार की नाही?

अध्याय १२: ह्या सर्व अध्यायांचा परिणाम म्हणून जेव्हा आपण ह्या पायऱ्या चढून झालेल्या आपल्या अध्यात्मिक उन्नती नंतर इतरांना देखील त्या चढण्यासाठी मदत करा आणि ही शिकवण इतरांना देत रहा जोपर्यंत संपूर्ण प्राणीमात्र एकाच तत्त्वावर तोलले जात नाहीत तो पर्यंत.

ह्या १२ पायऱ्या पार केल्यानंतर आपली नैतिक जबाबदारी आहे की आपण ही शिकवण पुढे देत राहावी, मी सुद्धा हेच करत आहे.

तुमचा कृपाभिलाषी
डॉ सैलेश राव



अत्यंत विस्मयकारक

१. विस्मयकारक घटना

२००५ साल. डिसेम्बर महीना होता. मी नुकताच थकुन भागुन सोफ्यावर पहुडलो, TV लावला. अमेरिकेचे Vice President (उपाध्यक्ष) अल गोर सॅन फ्रान्सिस्को मधील काही कार्यकर्त्यांशी जागतिक तापमान वाढी (ग्लोबल वॉर्मिंग) बद्दल बोलत होते. मी ते सर्व ऐकून थक्क होऊन गेलो, जरासा घाबरलोच. माझ्या बायकोला, जेनी ला म्हटलं, की "हे जे सांगतायत त्यात ५०% जरी खरं असेल तर मला वाटतं मी माझा वेळ व्यर्थ वाया घालवतोय, मी काय करतोय तर इंटरनेट १० पटीनी जलद करतोय". (मी पेशाने अभियांत्रिक आहे). जेनी सहज म्हणाली, की "तुम्हाला ते जास्त महत्वाचं वाटतय तर तुम्ही देखिल त्यासाठी काही प्रयत्न का करत नाही?"

आणि मी तेच केलं.

पूढचे तीन महिने मी त्यविषयी अजून अभ्यास केला आणि माझ्या लक्षात आलं की हे जेवढे दाखवले आहे त्याहीपेक्षा जास्त भयंकर आहे. अल गोर त्यांच्या भाषणात फक्त आपल्या इंधन अथवा उर्जेविषयीच्या गरजांचा आपल्या पृथ्विवर कसा परिणाम होतोय या बद्दल बोलत होते, पण आपल्या खाद्य आणि इतर अवस्ताव ग्राहक मागणीच्या परिणामांकडे दुर्लक्ष करत होते. असो. मी अल गोर यांना पत्र लिहून, मला त्यांच्या कार्यात सहभागी व्हायचे आहे असे कळवले. नोव्हेंबर २००६ ला मी नाश्विल (Nashville, USA) येथे जाऊन त्यांच्या कडून रितसर प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणादरम्यान, मी शपथ घेतली की 'जागतिक तापमानवाढ' या विषयी वर्षातून दहादा तरी मी लोकांपुढे सादरीकरण देइन आणि जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न करेन.

दिलेली शपथ पूर्ण केल्यानंतर, डिसेम्बर २००७ मधे मी ‘Climate Healers’ (क्लाइमेट हीलर्स)(पर्यावरण रक्षक) नावाने एक सामाजिक संस्था स्थापन केली. क्लाइमेट हीलर्स चे उद्दिष्ट पर्यावरणाचे रक्षण हेच आहे. परंतू इतर पर्यावरणप्रेमी अगदी अल गोर सुद्धा, हे बिघडलेला समतोल अजून बिघडु नये एवढेच बघतायत, याउलट ‘क्लाइमेट हीलर्स’ हे तो समतोल पूर्ववत कसा करायचा याकडे जास्त लक्ष देतील आणि देत आहेत. इतर पर्यावरण प्रेमी हे पर्यावरण वादाच्या तिसऱ्या पैलुकडे दुर्लक्ष करत आहेत तो म्हणजे, ‘वाढती ग्राहक मागणी’ विशेषतः अन्न आणि त्यात प्रमुखत्वे मांसाहार. उदाहरण द्यायच झालं तर समजा, तुमच्या डोक्यावर एक मोठा नारळाएवढा टेंगूळ आला आहे आणि ताप पण आहे १०१, तुम्ही डॉक्टर कडे जाता आणि डॉक्टर म्हणतात की ठीके मी तुमचा ताप १०२ पर्यंत जाणार नाही याची काळजी घेतो, आणि इकडे तुमच्या डोक्यावर अजून एक नारळाएवढा टेंगूळ आला आहे दूसऱ्या बाजूला. तुम्हाला नक्कीच डॉक्टर मूर्ख वाटेल आणि तुम्ही दूसरा डॉक्टर बघाल की नाही? तसच आहे, जसा डॉक्टर तुमच्या नारळाएवढ्या मोठया फोडाला दुर्लक्ष करून फक्त तुमचा ताप कमी करतो आहे, तसच पर्यावरण प्रेमी देखील करत आहेत. खरच, का कुणी ‘जागतिक तापमानवाढ ’ या गोष्टीचा गांभीर्याने विचार करत नाही किंवा मी ही तो आत्तापर्यंत का केला नाही . जेवढा मी पर्यावरण बदलाचा अभ्यास केला तेवढा जास्त मी उदासीन होत गेलो. मला तेव्हा जाणवलं, की मी खर तर तोपर्यंत प्रवाहाच्या विरुद्ध चाललो होतो आणि तो प्रवाह इतका जोरदार होता की मला उमगलच नाही की मी या समजासाठी काही कारु शकतो किंबहूना करायला पहिजे. मानव जात स्वतःच्याच नाशाची तयारी करत आहे आणि हे दुर्दैवाने कुणाला समजत नाहिये.

अखेरिस, मी माझ्या मनाची उदासीनता पूर्णपणे घालवली ती कर्नाटकातील ‘SAI’ सैंक्शूएरी (अभयारण्य) च्या मदतीने. ते खरच एक ‘अभय’ अरण्य आहे. मी एक सिस्टम डिज़ाइनर आहे आणि त्यामुळे मला सर्व काही परफ़ेक्ट लागते, SAI मधला तो निसर्ग, प्राणी, झाडं सगळेच अगदी परफ़ेक्ट वाटलं मला. निसर्ग किती परिपूर्ण आहे याची जाणिव झाली. मी SAI च्या मालकीण बाई पामेला यांना विचारलं,

“हे तुम्ही कसे घडवुन आणलत ?”

त्या म्हणाल्या,

“आम्ही इथले कॉफीचे मळे विकत घेतले, सर्व कॉफी ची खुरपं काढून टाकली आणि ही जागा प्राण्यांना दिली. पूढचं सर्व त्यांनी केलं. त्यांनी इथे बिया टाकल्या आणि नवीन झाडं उगवली ”

“काय सांगता ? तुम्ही फक्त प्राण्यांना ही जागा दिली आणि इथे पून्हा जंगल उभं राहीलं?”

“नाही, फक्त तेवढेच नाही. आम्हाला अजून एक करावं लागलं ते म्हणजे माणसांना इथे येण्या पासून रोखावं लागलं”
त्या क्षणी मला खूप मेल्याहून मेल्या सारखं झालं. माझ्याच घरात राहण्यास मी अपात्र आहे !
माझं जन्म गाव त्या SAI अभयारण्या पासून २०० किमी वर आहे, जिथे पाच दशका पूर्वी माझा जन्म झाला.

मनुष्य जात ही पृथ्वीवर राहण्यास अपात्र आहे का? असं दिसतय की जर माणसांना वगळलं तर पृथ्वीची भरभराट होईल. मात्र जेव्हा माणसं हया इतर जीवसृष्टी मधे मिसळतात तेव्हा समतोल बिघडतोच.
आपण सृष्टीवरील सर्वात बुद्धीमान प्राणी असून देखील हया पृथ्वीला साधं सांभाळण आपल्याला कठीण जात आहे, हे घृणास्पद आहे.

असच SAI अभयारण्यात फिरत असताना मी पाहीलं की एका हत्तीने झाडाची मोठी फांदी तोडली, पानं खाल्ली आणि फांदी खाली फेकून दिली, लगेच पामेला ला मी विचारलं
मी : “हा हत्ती जंगलाचं नुकसान नाही करते का आता? ”
पामेला : “अजिबात नाही, उलट जेव्हा हत्ती ही झाडाची मोठी फांदी तोडतो तेव्हा सूर्यप्रकाश खालच्या झूडपांना मिळतो. जर हत्तीने हे केले नाही तर हया घनदाट

जंगलात सूर्यप्रकाश खालच्या झूडपांना मिळणारच नाही आणि ती मरतील, तेव्हा निसर्गच हत्तीकडून हे करून घेत आहे आणि हत्ती निसर्गाचं ऐकतो आहे"
पामेलाच्या मते इतर सर्व प्राणीमात्र हे निसर्गानुसार वागतात, एकटा मनुष्य प्राणी नाही. मनुष्य प्राण्याला हया वसुंधरे वर राहण्यचा अधिकारच नाही !

त्याच्या पूढील वर्षी माझ्या नातीचा 'किमायाचा' जन्म झाला. तिचा जन्म झाला तेव्हा मी कॅलिफोर्नियाला होतो. महिनाभराने मी तिला बघायला ॲरिझोनाला गेलो. पहिल्यांदा मी तिला हातात घेतलं आणि ती जणू माझ्याकडे बघून हसली.
किमाया मधे तीन खंडांचं रक्त आहे असं मी म्हणू शकतो. तिचे आजी आजोबा कडून आशिया, आईकडून आफ्रिका आणि माझ्या मूलाचा म्हणजे तिच्या बाबांचा जन्म उत्तर अमेरिका मधला. त्यामुळे आशिया, आफ्रिका आणि उत्तर अमेरिका !
मला जणू वाटले की मी किमायाच्या रूपात मनुष्य जातीचं प्रतीकच माझ्या हातात धरलं आहे, जिथे मला वाटत होतं की मनुष्य प्राणी या वसुंधरेवर राहण्यायोग्य नाही तिथे हे छोटं पिल्लू हसून मला सांगतेय की,
"म्हणजे काय म्हणायचय तुम्हाला मला या पृथ्विवर येण्याचा अधिकार नाही? नक्कीच मला तो अधिकार आहे. तुम्हालाच मी अजून समजलेले नाही!"

मला जाणीव झाली की ही माझ्या आयुष्यातील अत्यंत अविस्मरणीय घटना होती.

मी चुकिचा विचार करत होतो.

आणि आता - माणूस देखील त्या जंगलातल्या हत्ती सारखाच या निसर्गाच्या परिपूर्णतेचा भाग आहे, - असे गृहीत धरून मला प्रत्येक गोष्टीचा पुनर्विचार करावा लागेल. मनुष्य प्राणी देखील निसर्गाचं ऐकू शकतो, त्या जंगलातल्या हत्ती सारखं. माझं विचारांच चक्र धावत राहीलं!

जशी मनुष्याकडे प्रवाह बदलण्याची क्षमता आहे तसच त्याच्या परिणामांची जबाबदारी घेण्याची देखील आहे!

पृथ्वीवर पहिले एक हिमयुग होते, मग तापमान वाढले आणि जीवसृष्टीला अनुकूल झाले. जवळ जवळ मागील दहा हजार वर्षापासून, आपण कळत नकळत जागतिक तापमान अजून वाढवतच आहोत त्यामुळे पृथ्वी पून्हा एक हिमयुग पाहणार नाही हे नक्की , पण आता वेळ आली आहे की हे अती वाढलेलं तापमान नियंत्रणात आणावं आणि हया वसुंधरेला आणि जीवसृष्टीला वाचवावं.

गस स्पेथ (शास्त्रज्ञ) म्हणतो,
“तीस वर्षा पूर्वी मला वाटलं होतं, जैविक विविधाततेचा अभाव, पर्यावरण बदल आणि निसर्गाचा ऱ्हास हे मनुष्या पूढील मुख्य प्रश्न आहेत.
आणि विज्ञानाच्या मदतीने हे प्रश्न सूटतील.
पण मी चूकिचा ठरलो!
खरं तर, मनुष्यापूढील मुख्य प्रश्न आहेत, स्वार्थी भाव, लोभ आणि कार्य उदासीनता! हे प्रश्न विज्ञान सोडवु शकत नाही त्यासाठी आध्यात्मिक आणि सांस्कृतिक बदलाची गरज आहे. आम्ही शास्त्रज्ञ हे कसं घड़वायचं हे जाणत नाही त्यासाठी दैवी शक्तीच हवी!”



फिनिक्सला स्थलांतर

२. फिनिक्सला स्थलांतर

किमायाच्या जन्मानंतर मी पुढचे वर्ष दीड वर्ष वरचेवर फिनिक्स ला जात राहिलो तिला पाहण्यासाठी. त्यानंतर २०१२ मध्ये आम्ही कायमस्वरूपी फिनिक्स ला राहायला गेलो, किमाया जवळ.

श्री औरोबिंदो म्हणतात, त्यांना तुरुंगातील त्यांच्या वास्तव्याने सगळ्या मधे कृष्ण कसा पाहावा हे शिकवले अगदी 'तुरुंग अधिकारी' आणि तिथल्या उंदरांमधे सुधा. मला 'कृष्ण' किमाया मधे स्पष्ट दिसत होता.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।

अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ४.७॥

हे भारता (भरतवंशी अर्जुना), जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास आणि अधर्माची वाढ होत असते, तेव्हा तेव्हा मी आपले रूप रचतो म्हणजेच आकार घेऊन लोकांसमोर प्रकट होतो.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।

धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥ ४.८॥

सज्जनांच्या उद्धारासाठी, पापकर्म करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी आणि धर्माची उत्तम प्रकारे स्थापना करण्यासाठी मी युगायुगात प्रगट होतो.

किमायाच्या जन्माच्या एक वर्ष आधी, माझी श्रीयुत जानी यांच्याशी शिकागो मध्ये गाठभेट झाली. त्यांनी एका हाताचा अंगठा माझ्या कपाळाच्या मध्यभागी ठेवला आणि दूसरा हात माझ्या डोक्याच्या मागे ठेवला आणि म्हणाले, "माझ्याकरवी भगवंत तुझ्याशी बोलत आहेत. तुझी कार्यप्रेरणा ईथून येतेय (त्यांनी माझ्या डोक्याचा मागचा हात किंचित दाबला) आणि तुझे कार्य ईथून होते (माझ्या कपाळाच्या मध्यभागी त्यांनी दाबले). कुठलाही स्वार्थ न ठेवता तुझे कार्य करीत रहा, मीच ते तुझ्याकडून करून घेत आहे."

श्रीयुत जानी यांनी जे संगितले तेच भगवत् गीतेमधे सांगितले आहे, भगवंतच आपल्या सर्वांकडून कार्य करवून घेत असतो. श्रीयुत जानी तिकडुन निघुन गेल्या नंतर बराच वेळ मला कपाळाच्या मध्यभागी दाब जाणवत राहिला. अजुनही जेव्हा मी प्राणायाम करतो तेव्हा तो जाणवतो.

माझ्यासाठी तरी माझी नात 'किमाया' भगवंताचे ते रूप आहे जे पर्यावरण बिघडवणाऱ्या मनुष्य प्राण्या पासून ते पर्यावरण साधक मनुष्य प्राण्या कडे जाण्याचे मार्गदर्शक आहे. आता मला या मार्गापासनं कुणीही परावृत्त करू शकत नाही.

मला माहीत होतं की मी ते सगळ करणार होतो जे किमाया(माझी नात) मला सांगेल. तिने सांगितलं की नाच तर मी नाचणार होतो, ती म्हणाली उड्या मारा तर मी उड्या मारणार होतो.

थोडक्यात किमाया ही माझा सर्वात मोठा गुरू आहे. मानवजात ही सुधा इतर प्राण्याप्रमाणे निसर्गाचा एक भाग आहे हे किमायाने मला शिकवले. आत्ता पर्यंत मी जसा घडलो किंवा घडवलो गेलो त्यातल्या पुष्कळ रूढ़ी हया अर्थहीन आहेत किंवा चुकिच्या आहेत हे मला तिने (माझ्या गुरुने) जाणवून दिले. ती माझ्यासाठी भगवंताचं रूप आहे, निव्वळ तिच्या येण्याने मला आपसुक हे साक्षातकार झाले.

मला फक्त एवढेच करायचे होते की तिला माझा मार्गदर्शक बनवायचे होते. तिच्या निरागस दृष्टीतून जग पाहायचे होते.


सत्य हे तुम्हाला मुक्त करते, खरंच.

HEAT म्हणजे **H**uman **E**arth **A**nimal **T**orture

HEAL म्हणजे **H**uman **E**arth **A**nimal **L**iberation

आपल्याला पर्यावरणाला त्रासदायक संस्कृती जपण्या ऐवजी पर्यावरण पूरक संस्कृती घडवायची आहे आणि त्यासाठी तुमच्यातल्या निरगसतेला (लहान मूलाला) जागृत ठेवा.

दृष्टिकोन बदला!


प्रेम
खोटं बोलू नये
तीन वचने

३. तीन वचने

किमाया आता माझ्यावर आधिराज्य करत होती. जेव्हा ती आमच्याकडे यायची तेव्हा तिला सतत माझ्याशी खेळायचे असायचे.

आम्ही चेंडु खेळायचो.

आम्ही लपाछपी खेळायचो.

आम्ही सापशिडी खेळायचो.

घराजवळ एके ठिकाणी टेकडी चढायला जायचो.

सागरगोटे खेळायचो. माझ्या आजोबांनी मला हा खेळ शिकवलेला तो मी किमायाला शिकवला, त्याचं एक छान गाणे आहे: (तुळू भाषेत)

"ठेकेला पुजेला

थराइक्कू नीरपोंडू

अथनेकु नीरपोंडु

साउथेकाईकू नीरपोंडु

अंचिना पोल

इंचीना पोल

डम, डम, डम,

डम, डम!"

हया तुळू गाण्याचा शब्दश: अर्थ आहे की पाणी इकडे तिकडे वाहते, झाडांना रोपट्यांनाना पोसते आणि शेवटी मधुर नारळ झाडावरून धपकन खाली पडतो.

हे गाणे म्हणत मी खाली झोपुन किमायाला माझ्या पायावर खेळवत असे आणि धपकन खाली पाडुन तिला मिठी मारत असे.
तिला हा खेळ फार आवडत असे, सारखं हेच खेळायचा तिचा हट्ट असे.
किमाया २ वर्षाची असताना मी तिला अभिवचन दिले, माझ्या आणि किमायाच्या नात्याचे मूळ या तीन वचनांवर आहे:
१. किमाया ही माझ्या आयुष्यतील सर्वात सुंदर गोष्ट आहे आणि ती कायमच सर्वोतकृष्ट राहील
२. माझं तिच्यावर नितांत प्रेम आहे आणि ते कायम तसेच राहील.
३. मी कायम तिच्याशी खरं बोलेन, काहीही झाले तरी खोटे बोलणार नाही.

ह्यातलं तिसरं वचन मी तिला मुद्दामच दिलं होतं. कारण मला हे आत्ता एवढ्या वर्षांनी समजलं होतं की लहानपणापासून मला कायमच खोटं सांगण्यात आलं आहे. अगदी शाळेच्या पाठ्यपुस्तकात देखील खोटच. प्रोटीन आणि कॅल्शियम विषयी तर अजूनही मुलांना चुकीचं शिकवलं जातं, पालकांना माहीत असतं की आपण मुलांना चुकीचं शिकवत आहोत तरीही केवळ रूढी परंपरागत चालू आहे म्हणून ते सरळ मुलांना खोटं सांगतात, कुठलीही शहानिशा न करता.

मुलांशी खोटं बोलणं हा माझ्या दृष्टीने गुन्हा आहे. समाज असे गुन्हे न करता जर मुलांना कायम सत्य सांगणारा असता तर किती बरं झालं असतं.

मी किमायाला ही अभिवचने दिल्यानंतर काही वर्षांनी ती माझ्याकडे आली आणि म्हणाली,

“आजोबा, तुम्हाला खात्री आहे की ‘माझा जन्म’ हाच तुमच्या संपूर्ण आयुष्यातील एक विस्मयकारक क्षण आहे ?”

मी म्हणालो, “किमाया ही एकच गोष्ट मी निसंदेह खात्रीने सांगू शकतो”



न संपणारे खेळ

४. न संपणारे खेळ

ज्या खेळामध्ये हार जीत असते असे खेळ किमायाला आवडत नसत, हा जर ती जिंकत असेल तर भाग वेगळा. तिला असे खेळ आवडत जे कधी संपतच नाहीत, सतत खेळतच राहायचं, कुणी जिंकणार आणि कुणी हरणार नाही. ती तोपर्यंत एक खेळ खेळायची जोपर्यंत तिला दुसरं काही खेळवसं वाटत नाही.

एकदा असंच आम्ही लपाछूपी खेळत होतो. किमाया माझ्याकडे आली आणि म्हणाली,

“आजोबा, मला नाही आवडत जेव्हा तुम्ही मला सापडत नाही. आता यापुढे मीच तुम्हाला सांगणार कुठे लपायचं ते म्हणजे मी लगेच शोधू शकेन”

मग ती मला शोधण्याचं खोटं खोटं नाटक करायची आणि जेव्हा तिला वाटेल तेव्हा माहितीच्या जागी येऊन मला शोधायची. ‘शोध घेणे’ हे तिला महत्वाचं नव्हतं, तिला फक्त खेळायचं असायचं.


आमच्या घराच्या स्वयंपाक घरात एक मध्यभागी ओटा आहे ज्याच्या भोवती आम्ही पकडा पकडी खेळायचो. किमायाला अखंड खेळायला आवडायचं त्यामुळे मी सुद्धा बराच वेळ तिला पळायला द्यायचो, मला तिला पकडताच येत नाहीये असं नाहीये असं नाटक करायचो. ती पाच वर्षांची होईपर्यंत हा खेळ सहज चालायचा मग मात्र ती खरोखरच त्या ओट्याच्या भोवती इतकी जोरात पळायची की मला तिला पकडताच येत नसे.

अखंड खेळत राहण्याची तिची सवय अगदी सापशिडी सारख्या खेळातही तशीच होती. कधी कुठल्या शिडीवरून चढायचं, कधी सापावरून खाली यायचं, कधी सरळ

सुरवातीपासून थेट शेवटच्या घरात जायचं हे सगळं तीच ठरवायची त्यामुळे तो खेळ कधी संपायचाच नाही जोपर्यंत तिला त्याचा कंटाळा येत नाही.

'पर्यावरण बदल' देखील थोडंफार असाच एक खेळ आहे असं मला वाटतं. आताच्या चालू घातक संस्कृती मध्ये एक जिंकणारा आहे आणि लाखो हरणारे आहेत, खेळ सीमित आहे. पण आता आपण जी पर्यावरण पूरक संस्कृती घडवू पाहत आहोत तो एक अखंड खेळ आहे ज्यात खेळाचे उद्दिष्ट आहे की खेळ सतत चालू राहावा.

सरतेशेवटी, शाश्वत हेच तर आहे. आपल्यालाऽ ह्या 'वसुंधरे' वर चिरंतर रहायचे आहे, नाही का?



राजा दशरथ असं का करतोय?

५. राजा दशरथ असं का करतोय?

माझं किमाया सोबतचं नातं भगवंत आणि भक्तासारखं होतं. ती जे सांगायची ते मी सगळं करायचो. तिची प्रत्येक आज्ञा पाळायचो. तिचा सर्व विचारांचा आदर करायचो.

मला हिंदू पुराणकथांबद्दल आदर आहे. मी किमायाला रात्री झोपताना लहान मुलांसाठी असलेली रामायण आणि महाभारताची पुस्तकं वाचून दाखवत असे. एकदा असंच पुस्तक वाचत असताना ती जराशी कठोरपणे मला म्हणाली,

“राजा दशरथ असं का करतोय?”

मी गोंधळलो. मी विचारलं

“का? काय झालं? काय केलं राजा दशरथानं ?”

“राजा दशरथ त्या हरणाला बाण का मारतोय ? ते हरिण फक्त तिथे नदीचं पाणी प्यायला आलं आहे आणि राजा दशरथ त्याला बाण मारत आहे ? का करतोय राजा असं ?”

आणि ती पुढे म्हणाली

“आजोबा, पुन्हा मला अश्या गोष्टी वाचून दाखवू नका ”

त्यानंतर मी किमायाला पुराणकथा कधी वाचून दाखवल्या नाहीत.

पुराणकथेतील हे संदर्भ प्रतीकात्मक असतात हे खरं आहे पण किमायाला प्राण्यांच्या हिंसेबद्दल काहीच ऐकायचं नव्हतं, प्रतीकात्मक असलं तरीही.


समाप्त

६. सिंड्रेला ची तत्वे

लिली जेम्स यांचा 'सिंड्रेला' सिनेमा २०१५ मध्ये प्रदर्शित झाला. तेव्हा किमाया फक्त ४ वर्षांची होती. त्या दिवशी तिला सांभाळण्याची जबाबदारी माझ्याकडे होती, तिने हट्ट केला की तिला 'सिंड्रेला' चित्रपट आत्ताच्या आत्ता पाहायचा आहे.

मी तिला हो म्हंटलं. मला वाटलं की वर्षानुवर्ष माहीत असलेल्या ह्या कहाणीचा अजून एक पुनर्रचित चित्रपट पाहून मला कंटाळा येईल. तथापि पहिल्या दहा मिनिटात च मी जागरूक झालो आणि लक्षपूर्वक सिनेमा पाहू लागलो. त्यात सिंड्रेला म्हणाली

"धैर्यशील बना. दयाळू व्हा आणि सर्व काही ठीक होईल. "

हे अगदी साधं सरळ वाक्य आहे पण त्याचा गर्भितार्थ फार मोठा आहे. ह्या पृथ्वीची भरभराट व्हावी असं आपल्याला वाटत असेल तर आपल्याला एवढेच करायचे आहे. तुमच्या सभोवताली सर्वत्र दररोज हिंसेचं वातावरण असताना देखील स्वतः 'दयाळू' राहण्यासाठी खरच 'धैर्य' लागतं.

तो सिनेमा फक्त किमायासाठी नव्हता तर माझ्यासाठी सुद्धा होता.

सिंड्रेला ची ही पुढची दोन वाक्ये म्हणजे 'क्लाइमेट हीलर्स' या माझ्या सामाजिक संस्थेचं ब्रीद वाक्य आहेत,

"सर्वजण ते करतायत ह्याचा अर्थ असा नव्हे की तेच करणं बरोबर आहे"

आजपर्यंत रूढी परंपरेनुसार चालत आलेल्या गोष्टी चुकीच्या असतानाही करत राहणं हा गुन्हा आहे. रूढी परंपरा प्रत्येक टप्प्यावर चाचपून पाहणे आणि त्यात गरज असेल तेव्हा सुधारणा करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.

सिंड्रेलाचे दुसरे एक वाक्य होते,

“जग कसं असायला पाहिजे याची कल्पना करा आणि त्याप्रमाणे कृती करा”

आपल्याला हे जग कसं असावं असं वाटतं ह्याचा विचार करा आणि ते तसं बनवण्यासाठी कार्य करा, जगरहाटीप्रमाणे नुसतेच त्यासोबत वाहू नका.

ही तीन सिंड्रेला तत्त्वे मी माझ्या युरोपियन यूनियन पार्लमेंट मधील सादरीकरणात नमूद केल्या आणि तिथल्या लोकांनी त्याचा अक्षरशः जयजयकार केला.

क्लाइमेट हीलर च्या कार्याचे हे तीन आधार स्तंभ आहेत.

पृथ्वीला त्रास होतोय....



स्पष्ट आहे,
कृपया पहा

७. चेतना सर्वत्र आहे

किमाया सर्वांच्या बाबतीत संवेदनशील आहे अगदी वस्तूंच्या बाबतीत देखील. एकदा ती माझ्याबरोबर *प्रेसकॉट, ऍरिझोना* मधील एका ग्रंथालयात आली होती. आमच्या घरापासून साधारण दोन तासांवर आहे. मी तिकडे 'पर्यावरण बदल' ह्या विषयावर बोलणार होतो. ती पूर्ण वेळ शांतपणे तिकडे बसली आणि मग आम्ही घरी परत आलो.

घरी आल्यावर लक्षात आलं की मी माझा लॅपटॉपचा पॉवर अडॉप्टर ग्रंथालयातच विसरलो होतो. मी इलेक्ट्रॉनिक वस्तू अगदी त्या बंद पडेपर्यंत वापरतो, ती माझी सवय आहे त्यामुळे पॉवर अडॉप्टर खेरीज मला आता लॅपटॉप वर काम करणे शक्य नव्हते. कारण त्या लॅपटॉप ची बॅटरी इतकी जुनी होती की अडॉप्टर शिवाय जास्त वेळ चालू शकली नसती.

मी विचारच करत होतो की आता परत जाऊन पॉवर अडॉप्टर घेऊन यायचं म्हणजे जाण्या येण्यात ४ तास जातील; जाऊन यावं की इथेच दुसरा २० डॉलर ला विकत घ्यावा. मी सहज म्हणून किमायाला विचारलं की "मी काय करू ?"

ती पटकन म्हणाली,

"आजोबा, तुम्हाला जावच लागेल ग्रंथालयात नाहीतर त्या पॉवर अडॉप्टर ला वाईट वाटेल तो लॅपटॉप सोबत नसला तर"

आणि आम्ही खरच तेच केलं. आम्ही ४ तासात जाऊन परत आलो, किमाया फक्त माणसांच्या बाबतीत नाही तर निर्जीव वस्तूसाठी देखील संवेदनशील आहे.

वेदांमध्ये म्हंटले आहे की 'चेतना सर्वत्र आहे, प्रत्येक गोष्टीत आहे'. किमाया खरच प्रत्येक गोष्टीत चेतना पाहते.

त्याच वर्षी मी यूनाइटेड नेशन्स च्या 'पर्यावरण बदल' विषयक एक बैठकी साठी पॅरिस, फ्रान्स ला गेलो होतो. तिथून परत येत असताना मला आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक जोडपं भेटलं. त्यांची दोन मुलं होती. नवरा फोनवर बोलता बोलता फिरत्या जिन्यांवरून पुढे गेला आणि बायको खाली उभी होती. तिच्यासोबत तिचं बाळ, बाबागाडी होती आणि साधारण किमायाच्याच वयाची एक मुलगी होती शिवाय एक चारचाकी बॅग. तिने मला विचारलं

"कृपया मला एक मदत कराल का?"

मी म्हंटल

"हो का नाही? मी तुमची बॅग नेऊ का ?"

ती म्हणाली

"नाही. फक्त जिन्यांवरून जाताना माझ्या मुलीला मदत कराल का? "

मी त्या मुलीचा हात पकडला आणि तिला फिरत्या जिन्यांवरून घेऊन गेलो. किमायाचा हात पकडल्यावर जशी माझी भावना असते, जी माया असते अगदी तशीच मला त्या मुलीचा हात पकडल्यावर देखील जाणवली. काहीच फरक नव्हता.

मी तत्क्षणी सुजाण झालो आणि मला वाटलं की जगातली सर्वच लहान मुलं माझी नातवंड आहेत आणि मी हे माझं पर्यावरण सुधारण्याचं कार्य करतोय ते त्या सर्वांसाठीच, फक्त किमाया साठी नव्हे.

हे विश्वची माझे घर!


बालवाडीला भेट
तुम्ही जाणूनबुजून
निष्पाप
एखाद्या प्राण्याला
दुखवाल का?

८. किमायाच्या शाळेची भेट

किमायाला एकदा “Vegan” (अहिंसक) असा शब्द लिहलेलं एक गळ्यातलं भेट म्हणून मिळालं. किमायाने मला आग्रह केला की मी तिच्या शाळेत यावं आणि सर्वांना “Vegan” (अहिंसक) म्हणजे काय ते सांगावं. मी तिला म्हंटलं की जर तिच्या शिक्षकांनी मला असं करण्याची परवानगी दिली तर मी नक्कीच तिच्या वर्गात येऊन सर्वांना “Vegan” (अहिंसक) म्हणजे काय ते समजावेन.

किमायाने तिच्या शिक्षकांची परवानगी मिळवली आणि मग दुसऱ्या दिवशी मी तिच्या शाळेत गेलो. किमायाचे मित्र मैत्रिणी माझ्या भोवती गोळा झाले आणि त्यांनी विचारलं

““Vegan” (अहिंसक) म्हणजे काय ?”

मी म्हणालो

“जर समजा आत्ता इथे एक ससा उद्या मारत मारत आला तर तुमच्यापैकी किती जण त्याच्याशी खेळतील?”

“आम्ही सगSSळे जण त्याच्यासोबत खेळू...” सर्व मुलं एकदमच ओरडले.

“आणि किती जण त्या सश्याला दुखापत करतील?”

“कुSSण्णीच नाही...”

मी म्हणालो

“मग तुम्ही सर्व जण “Vegan” (अहिंसक) आहात. Vegan (अहिंसक) म्हणजे तुम्ही जाणीवपूर्वक कुठल्याही प्रणयाला मुद्दाम त्रास देणार नाही ”

सर्व मुले उत्तेजित झाली. नवीन काही शिकायला मिळालं म्हणून खुश झाली.

त्याच्या पुढच्या आठवड्यात माझ्या बायकोला जेनी ला शाळेच्या मुख्याध्यापकांचा फोन आला. त्यांनी विनंती केली की पुन्हा असं काही मुलांना सांगू नका. मला जेवढं माहीत आहे त्यावरून, मी मुलांना “Vegan” (अहिंसक) म्हणजे काय ते समजावल्यानंतर सर्व मुले घरी जाऊन त्यांच्या पालकांना म्हणू लागली की ते “Vegan” (अहिंसक) आहेत. त्यामुळे पालकांनी शाळेत तक्रार केली की मुलांना काय शिकवण मिळते आहे. अखेरीस मुख्याध्यापकांनी पुन्हा असे न करण्याची विनंती केली.

काही आठवड्या नंतर किमायाच्या शिक्षकांचा मला फोन आला आणि त्यांनी विचारले की मी त्यांच्या शाळेत येऊन मुलांना ‘भारत’ देशाविषयी काही माहिती सांगावी. मी मान्य केलं आणि होकार कळवला.

मुख्याध्यापकांनी पुन्हा माझ्या बायकोला फोन केला आणि सांगितले की तुमचे यजमान शाळेत ‘भारत’ देशाविषयी बोलायला येणार आहेत तेव्हा कृपया त्यांना “Vegan” (अहिंसक) हा शब्द टाळायला सांगा. मी ते ही मान्य केले.

मी ठरल्या दिवशी शाळेत गेलो आणि माझा लॅपटॉप चालू करत होतो. सर्व मुले माझ्या अवतीभवती गोळा झालेली. तेवढ्यात मुख्याध्यापक वर्गात आले.

मुले मला “Vegan” (अहिंसक) विषयी बोलण्याचा आग्रह करत होते. मुलांनी हेही सांगितले की त्यांचे पालक त्यांना वीगन बनण्यापासून रोखत आहेत.

मुख्याध्यापकांच्या लक्षात आले की ‘वीगन’ विषयी जाणून घेण्याची मुलांची ईच्छा आहे आणि त्यामुळे माझ्या पुढे ‘वीगन’ विषयी बोलण्यावाचून गत्यंतरच नव्हते.

काही महिन्यांनी मला समजले की मुख्याध्यापकांनी एक ‘व्हॉट द हेल्थ’ नावाचा माहितीपट बघितला आणि त्या स्वतः वीगन झाल्या.



१. इच्छापूर्ती झाड

किमायाच्या शाळेत मी गेलो होतो तेव्हा किमायाने मला वर्गाला 'इच्छापूर्ती झाडाची ' गोष्ट सांगण्याचा आग्रह केला. किमायाला ती गोष्ट फार आवडत असे.

गोष्ट अशी सुरू होते की, काही मुलं जंगलात त्यांच्या झोपडी च्या बाजूला दगड, काट्या आणि बाहुल्यांशी खेळत असतात. त्यांच्याकडे पाहुणे म्हणून आलेले काका त्यांना बघतात आणि म्हणतात,

“अरे मुलांनो तुमच्या झोपडीच्या बाजूला हे इच्छापूर्ती झाड असताना तुम्ही असं दगड आणि काट्याकुट्यांशी का खेळताय? जा, त्या झाडाखाली उभं राहून तुम्हाल काय हवय ते मागा, ते झाड तुम्हाला ते नक्कीच देईल. मग तुम्हाला चांगली खेळणी मिळतील आणि दगडांशी खेळावं लागणार नाही.”

मुलांना वाटलं काका उगाचच काहीतरी सांगतायत, आपण मागू, ते देणारं असं कुठे झाड असतं का? काका तिथून जाईपर्यंत मुलं थांबली आणि जसे काका तिथून निघून गेले तसे मुलं लगेच झाडाखाली गेली आणि हवं ते मागू लागली.

मुलांनी झाडाकडे मिठाई मागितली. खरच त्यांच्यापुढे मिठाई आली. मुलांनी त्या मिठाई वर अक्षरशः ताव मारला परिणामी मुलांची पोटे बिघडली आणि ती आजारी पडली.

मुलांनी खेळणी मागितली आणि त्यांना खरच खेळणी मिळाली. थोडा वेळ मुलं त्या खेळण्यांसह खेळली पण लगेचच त्यांना त्या खेळण्यांचा कंटाळा येऊ लागला.

मग मुलांनी अजून अत्याधुनिक खेळणी मागितली, ती सुद्धा त्यांना मिळाली पण मुलांना त्या खेळण्यांचा तर आधीपेक्षा लवकर कंटाळा येऊ लागला.

काहीतरी गडबड होत होती. मुलांना कळताच नव्हतं. खरतर मुलं जे मागत होती ते सर्व झाड त्यांना देत होतं पण मुलांना चिरंतर आनंद होण्याऐवजी लगेचच कंटाळा येत होता. इच्छापूर्ती सोबत आनंद येण्याऐवजी उलट कधी न येणारा कंटाळा सोबत येत होता.

मुलांना काही कळत नव्हतं. त्यांना फक्त एवढच कळत होतं की त्यांना अजून काहीतरी मागायचं आहे आणि तसं ते झाडाकडे अजून अजून मागतच राहिले. पण जेवढ्या त्यांच्या मागण्या पूर्ण होत होत्या तेवढं त्यांचं समाधान लोप पावत होतं आणि मागण्या वाढतच राहिल्या.

हळू हळू मुले मोठी झाली. मग ती तरुण मुले आणि मुली त्यांच्या त्या वयातील आवडीनुसार मागणी करू लागले. इच्छापूर्ती झाड त्यांना ते सगळं देत ही होतं परंतू त्यासोबत समाधान काही येत नव्हतं. आता हे तरुण लहानपणीपेक्षा अजूनच मागण्या वाढवू लागले. समाधान मिळवण्याच्या शोधात त्यांची दयनीय अवस्था होत होती.

तारुण्य संपून हळू हळू ही मुले वार्धक्याकडे वळली. वृद्धापकाळात सर्व मुले आणि मुली झाडाखाली जमली. यावेळेस त्यांचे तीन गट तयार झाले होते.

पहिला गट म्हणाला "जोपर्यंत ह्या इच्छापूर्ती झाडाविषयी आम्हाला माहीत नव्हतं तोपर्यंत आम्ही खरच खूप समाधानी आणि आनंदी होतो. ही निव्वळ एक लबाडी आहे. सगळं हास्यास्पद आहे."

वस्तुतः ह्या गटाला ईच्छापूर्ती झाडाचे महत्त्व खऱ्या अर्थाने कळलेच नव्हते. ते मूर्ख होते.

दुसरा गट म्हणाला "आपण आतापर्यंत या झाडाकडे चुकीच्या गोष्टी मागत राहिलो. त्यातल्या कुठल्याच गोष्टीने समाधान मिळाले नाही. त्यापेक्षा कदाचित आपण जे मागितलं त्याहून काही वेगळं मागितलं असतं तर जास्त बरं झालं असतं "

हा गट अजूनच मूर्ख निघाला. त्यांनाही झाडाची महती नाहीच समजली.

आता तिसरा गट मात्र शतमूर्खांचा होता. ते झाडाखाली आले आणि म्हणाले

"ह्या झाडाने दिलेल्या गोष्टींनी आमची दयनीय अवस्था झाली आहे. त्यापेक्षा मेलो असतो तर बरं झालं असतं "

झाडाने ताबडतोब त्यांची ईच्छा पूर्ण केली. ते सर्वजण मरून गेले. पण जसं आधीच्या मागण्यांसोबत ते झाड विरोधी काही देत होतं (असंतुष्टता) तसंच आता देखील ह्या गटाला मृत्यू दिल्यानंतर लगेच त्यांना पुनर्जन्म देखील दिला.

त्यादरम्यान एक व्यंग मुलगा लांबून झोपडीच्या खिडकीतून हे सगळं पाहत होता. त्याला देखील झाडाखाली जाऊन स्वतःसाठी चांगले पाय मागायचे होते जेणेकरून त्याला नीट चालता येईल पण तिकडे लोकांची आधीच एवढी गर्दी होती की तो पोहचू शकत नव्हता.

तो जागीच उभा राहून पाहू लागला. तो बघत होता की ईच्छापूर्ती झाड, सर्वांच्या ईच्छा तर पूर्ण करत आहे पण सर्वांची अवस्था मात्र दयनीय आहे. कुणीच समाधानी आणि आनंदी दिसत नाही. काहीजण झाडापर्यंत पोहोचण्यासाठी इतके धडपडत होते की दया यावी तर काही इच्छा पूर्ण होऊनही असमाधानी होते. सर्व प्राणिमात्र 'ईच्छापूर्ती' मुळे त्रासलेले होते.

अचानक त्या व्यंग मुलाला साक्षात्कार झाला. त्याला झाडाचे महत्त्व कळत होते. आता त्याला समोरच्या असमाधानी आणि हावरट, त्रस्त लोकांविषयी करुणा वाटू लागली. त्यांची दयाच येऊ लागली. झाडाकडे काही मागण्याची त्याची स्वतःची हाव नष्टच झाली आणि झाडाविषयीची त्याची आसक्ती सुटली. आता त्याला त्याच्या व्यंगाचे काही वाईट वाटत नव्हते उलट तो त्यासोबत आनंदी आणि समधानीच होता. आसक्ती सुटल्यामुळे खरतर तो आता सर्वाहून अधिक आनंदी होता.

व्यंग मुलाला काय बरं साक्षात्कार झाला असेल?

'*जर तुम्ही स्वतःसाठी मागत राहिलात तर ईच्छापूर्ती झाड तुम्हाला कमजोर आणि दुःखी बनवते. याउलट, तुम्ही इतरांसाठी आनंद मागितलात तर तुम्ही स्वतः देखील समाधानी राहता कारण तुमची ईच्छा पूर्ण झाली आणि शिवाय तुमच्या आजूबाजूचे इतर ही तुमच्या ईच्छेप्रमाणे आनंदी आहेत.*'

आपल्या भोवताली जर सुखी आणि आनंदी समाज असेल तर आपल्यावर ही त्याचा सकारात्मक परिणाम होतो.



'स्लॉथ' प्राण्याची गोष्ट

१०. 'स्लॉथ' प्राण्याची गोष्ट

किमायाला झोपवण्याचं काम शक्यतो माझ्यावरच असे. मी तिला झोपवताना नेहमी गोष्टी सांगायचो. किमायाला कुठल्याही प्रकारची हिंसा ऐकायची नसायची त्यामुळे नेहमीच्या परिकथा किंवा पुराणकथा मला बदलून सांगाव्या लागत कारण आपल्या त्या सर्वच कथांमध्ये थोड्याबहुत प्रकारची हिंसा ही आहेच.

आम्ही दोघांनी मिळून बनवलेल्या त्या गोष्टी खरच मजेशीर असायच्या. तिला प्राण्यांच्या गोष्टी आवडत असत आणि गोष्टीतल्या प्रत्येक प्राण्याला नाव हे असलाच पाहिजे शिवाय त्यातल्या एका तरी प्रणयच नाव 'किमाया' असलं पाहिजे हा तिचा आग्रह.

आम्ही बनवलेली तिची सगळ्यात आवडती गोष्ट म्हणजे 'स्लॉथ कुटुंब' (स्लॉथ नावाचा जगातला सर्वात आळशी प्राणी आहे. हा प्राणी मध्य आणि दक्षिण अमेरिकेत आढळतो.). ती गोष्ट अशी आहे,

"एकदा एका जंगल्यातल्या झाडावर आई, बाबा आणि एक छोटा स्लॉथ राहत असतात. रोज सकाळी आई लवकर उठून छोटा स्लॉथ साठी खायला आणत असे. एके दिवशी आई आजारी पडते आणि ती बाबाला उठवते आणि बाळासाठी खायला आणायला सांगते. अत्यंत आळशी असा तो स्लॉथ

'हो करतो '

एवढे म्हणतो आणि झोपेतच चालत जातो. तो जिथे जायचं तिथे न जाता भलत्याच ठिकाणी जातो. बऱ्याच वेळानंतर तो परत येतो आणि त्यांनी एक फळ आणलेलं असतं.

छोटा स्लॉथ म्हणतो,

“हे काय आहे?”

बाबा म्हणतो,

“हे नासपती फळ आहे ”

“पण आई तर माझ्यासाठी नेहमी आंबा आणते. मला नासपती नकोय. ”

आई म्हणते,

“अहो, तुम्ही कोणत्या बाजूला गेलात? ह्या बाजूने गेलात की एक मोठं आंब्याचं झाड आहे.”

“मी दुसऱ्या बाजूला गेलो”

छोटा स्लॉथ आता रडूच लागला आणि हट्ट करू लागला,

“मला हे नासपती नकोय, मला आंबाच हवाय”

बाबा म्हणतो,

“ठीक आहे. पण मला त्यासाठी सहा तास लागतील. एक तास ह्या झाडावरून खाली उतरायला, एक तास आंब्याच्या झाडापर्यंत जायला, एक तास आंब्याच्या झाडावर चढायला आणि मग पुन्हा तिथून उतरून परत या झाडावर चढायचं म्हणजे सगळे मिळून सहा तास.”


छोट्या स्लॉथ आश्चर्याने म्हणालं,

“काय? सहा तास??? सहा तास!!!”

“असुदे, द्या इकडे ते नासपती, मी खातो.”

किमाया या गोष्टी वर खळखळून हसत असे. तिला कधीही ह्या गोष्टीचा कंटाळा आला नाही.

साहित्य: शेंगा, भाज्या, धान्ये,
औषधी वनस्पती, हळद, प्रेम भाव



युनिटी खिचडी

११. यूनिटी स्ट्यू

किमायाला मला स्वयंपाकात मदत करायला फार आवडे. भाज्या चिरणे, मसाला कुटणे, तांदूळ डाळ धुऊन घेणे, किंवा इडल्या लावणे ही तिची आवडती कामे. पण सगळ्यात आवडतं काम म्हणजे सूप बनवताना ते ढवळत राहणे.

वेजिटेबल सूप तिला फार आवडे. बटाटे, गाजर, फरजबी किंवा कुठलीही दुसरी भाजी, हिरव्या भाज्या, कांदा, टोमेटो, आलं असा सर्व घालून आम्ही ते सूप बनवत असू. तिला इडली सांभार पण फार आवडे.

खुपदा असा भाज्यांचं सूप प्यायलं तिने. एकदा तिने मला त्यात पास्ता घालायला सांगितला, माझ्या डोक्यात आलं की हे आता नुसतं सूप नाही पूर्ण आहार च आहे. हे तर स्ट्यू आहे, नुसतं सूप नाही.

त्यानंतर आम्ही त्यावर खूप प्रयोग केले. वेगवेगळ्या भाज्या, धान्य, वेगवेगळे मसाले वापरून पाहिले आणी सरते शेवटी आम्ही यूनिटी स्ट्यू ची एक पाककृती तयार केली. खर तर एक साचा तयार केला, त्यात कुणीही आपापल्या आवडीनुसार जिन्नस वापरू शकतात.

यूनिटी स्ट्यू साठी लागणारे जिन्नस

- **२ कप शिजवलेली डाळ/ किंवा शिजवलेले कडधान्य (तूरडाळ, मसूर डाळ, वाफवलेली चवळी, मटकी, मूग इत्यादी)**
- **२ कप भाज्या (बटाटे, गाजर, सेलरी , रताळं, भोपळा इत्यादी)**
- **१ कप (पूर्ण धान्य जसे की पास्ता, भात/ब्राऊन राइस, बार्ली)**
- **१ मध्यम आकाराचा कांदा**
- **१ टोमॅटो**
- **१ लिंबाचा रस**
- **अर्धा इंच आल्याचा तुकडा**
- **१ कप हिरव्या भाज्या (रोझमेरी, पालक, सिलंत्रो)**
- **चवीनुसार मीठ**
- **काळे मिरे**
- **हळद**
- **हिंग**
- **४ कप पाणी**

पाककृती

कांदा, टोमॅटो, आणि आल्याचं वाटण करा किंवा प्युरी करा.

एकीकडे पाणी उकळत ठेवा. त्यात तुमच्या आवडत्या भाज्या, कांदा-टोमॅटो आणि आल्याचं वाटण, हळद, लिंबाचा रस, हिंग, मसाला, आणि चवीनुसार मीठ घाला. मसाला म्हणजे तुम्ही काळी मिरी पूड, हर्ब्स , धणे पूड, जिरे पूड वापरू शकता किंवा फक्त काळी मिरी पूड देखील पुरेशी आहे. आलं आणि हिंग वातशामक आहे. वातट डाळींचा पोटाला त्रास होऊ नये म्हणून उपयुक्त आहे.

भाज्या शिजत आल्या की त्यात उकडलेल्या डाळी, उकडलेले कडधान्य वैगरे घाला. १० मिनिटं उकळी येऊ द्या. गॅस बंद करून झाकून ठेऊन ५ मिनिटं सर्व मुरू द्या.

ह्यात तुम्ही हव असेल तर पास्ता वैगरे घालू शकता नाहीतर नुसतं पण पिऊ शकता.

माझ्या 'फूड हिलर्स' या संस्थेमार्फत फिनिक्स ला आम्ही जे अन्नदान करतो त्यात हे स्ट्यू नेहमीच असते. ह्याला आपण 'पूर्णान्न' म्हणू शकतो कारण ह्यात शरीराला आवश्यक सर्व पोषण तत्त्वे आहेत. ह्या स्ट्यू मुळे पोटही भरते आणि आवश्यक पोषण मिळाल्यामुळे शरीराची झीज भरून निघते. अगदी तसंच आता आपल्या ग्रहाची (पृथ्वीची) झालेली झीज भरून काढण्यासाठी पृथ्वीला देखील योग्य पालन पोषणाची गरज आहे.   आपण सर्वांनीच विमान प्रवास करताना ही सूचना ऐकली असेल की अपघात प्रसंगी "दुसऱ्याला मदत करण्याआधी स्वतःचा ऑक्सीजन मास्क लावावा". तसंच ह्या पृथ्वीला भरून काढण्याआधी आपण प्रत्येकाने स्वतःचे पोषण योग्य प्रकारे केले पाहिजे तर पृथ्वीला आपण सावरू शकू, नाही का?

मी सभोवताली बघतो तेव्हा मला एक तर श्रीमंत, खाण्याचा अतिरेक करणारे लोक दिसतात किंवा ज्यांना खायला मिळत नाही असे गरीब दिसतात. दोघेही 'रोगी' च. रोग्यांचे आजार फक्त थोडे वेगळे. खरच कधी कधी असं वाटत की सर्व प्राणिमात्रात आपली मानव जातच एक अशी आहे की जीला "कसं आणि किती" खायचं हे कळत नाही. एका संशोधकानुसार, ह्या पृथ्वी वर जेवढे लोक सध्या आहेत त्यांना

पोसण्यासाठी जितकी जमीन कसायला पाहिजे त्याच्या सहा पट अधिक जमीन आपण वापरतोय आणि त्यासाठी आपण वृक्षतोड केली आहे, डोंगर ओसाड केले आहेत पण तरीही माणूस अतृप्त आहे, हावरट आहे. सहा पट जास्त वापरूनही माणसाची भूक शमलेली नाही ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.


असं का असेल? कारण हे आहे की ही जमीन माणूस चुकीच्या पद्धतीने वापरत आहे. ते कसे विचाराल तर, सोपं गणित आहे. ऐकून आश्चर्य वाटेल की जगभरात बहुतांश जमीन ही पाळीव प्राण्यांच्या संगोपनासाठी वापरतात आणि अगदी थोडा भाग हा शेती साठी वापरतात. माणूस आपली भूक ह्या जनावरांना खाऊन भागवतो आहे. पण त्यातून त्याला ना पोषण मिळत आहे आणि ना ही सुदृढ आरोग्य. या उलट जर माणूस जास्तीत जास्त जमिनीवर शेती करेल तर आपण पृथ्वीचा जवळ जवळ अर्धा भूभाग पृथ्वीला परत करू शकतो जिथे निसर्ग आपोआपच सृष्टी पुन्हा निर्माण करेल. शिवाय माणूसही सुखी राहील. सात्विक आणि शाकाहारी (इतर प्राण्यांचे दूध किंवा दुग्धजन्य पदार्थ नाही) सेवन केल्यामुळे आपण निरोगी तर राहूच शिवाय निसर्ग सौंदर्य अनुभवता येईल.

कोविड च्या काळात मी आणि किमायाने ह्या आमच्या 'यूनिटी स्ट्यू' चे पुष्कळ प्रकार बनवले आणि फिनिक्स मधल्या गरजू लोकांना अन्नदान केले.

मला असं वाटतं की सात्विक अन्न जर समाजाला नेहमीच मिळालं तर समाज स्वतःच्याच गुलामगिरीतून म्हणजे खाण्याच्या वाईट सवयींतून मुक्त होईल आणि समजाचा ह्रास टळेल.

आता अशी वेळ आली आहे जिथे समाजाला स्वतःची उन्नती करण्यासाठी स्वतःच प्रयत्न करण्याची गरज आहे. पर्यावरण सुधारायच असेल, या पृथ्वीचा समतोल राखायचा असेल तर एक सुदृढ आणि निरोगी समाज आवश्यक आहे.

नोव्हेंबर १९, २०२२ ला ह्या 'यूनिटी स्ट्यू' ची माझ्या 'फ़ूड हिलर्स' या संस्थेकरवी उत्पत्ति झाली. हा दिवस 'जागतिक फ़ूड हिलर्स' दिवस म्हणून आम्ही साजरा करतो, ह्या दिवशी माझी नात किमाया १२ वर्षांची झाली.



गट्टी फू

The Pinky Promise



१२. गट्टी फू

‘क्लाइमेट हीलर्स’ ची कामे करता करता मला पुष्कळ गोष्टी स्पष्ट होत होत्या. जगातील वन्य प्राण्यांचा ह्रास होत चालला होता. आता पर्यावरण घातक समाजाला पर्यावरण पूरक समाज होणं हे अत्यंत गरजेचं होत चाललं होतं. ह्याचं मुख्य कारण म्हणजे आपण पर्यावरणासोबत करत असलेल्या प्रत्येक चांगल्या वाईट गोष्टीचा परिणाम हा वन्य प्राण्यांवर होत असतो.

माणसाने वन्य प्राण्यांचे निवासस्थान हिसकावून घेतलेले आहे, त्यांचे पिण्याचे पाणी देखील दूषित करून टाकले आहे म्हणजेच नद्या दूषित केलेल्या आहेत. आणि हे सर्व कशासाठी तर माणसाला स्वतःला उपयोगी असे पाळीव प्राणी पाळायचे आहेत. पशुपालन व्यवसाय करून माणसाने जवळ जवळ निसर्गाचा ह्रास केलेला आहे. शेती करून कष्ट करण्याऐवजी सोयीस्कर अश्या पशुपालनाकडे माणूस वळला आणि आता हे पाळीव प्राणी इतके अनावश्यक वाढले आहेत की त्यांचा उदरनिर्वाह करण्यासाठी जे जंगल वापरले जाते आहे ते वन्य प्राण्यांच्या वापराहून १० पट अधिक आहे. परिणामी वन्य प्राणी लोप पावत आहेत.

‘द वर्ल्ड वाइल्डलाइफ फंड’ नावाची संस्था १९७० पासून वन्य प्राण्यांच्या संख्येतील घट नोंदवत आहे. ह्या संस्थेमार्फत ‘लिव्हिंग प्लॅनेट रिपोर्ट’ हे पत्रक दर दोन वर्षांनी प्रकाशित केले जाते. मागील चार वर्षांतील वन्य प्राण्यांच्या संख्येतील घट ह्या पत्रकात नोंद केली जाते. २०१४ सालच्या ह्या पत्रकानुसार १९७० ते २०१० ह्या चाळीस वर्षात वन्य प्राण्यांची संख्या ५२ टक्क्यांहून अधिक कमी झाली आहे.

जेव्हा २०१४ मध्ये मी त्यांचा हा रिपोर्ट वाचला तेव्हा माझ्या डोक्यात आलं की ढोबळमानाने वन्य प्राण्यांची घट आणि जागतिक अर्थव्यवस्था वाढ हे सम प्रमाणात असतील तर २०२६ पर्यंत १००% वन्य प्राणी लोप पावलेले असतील.

ह्या विचाराने खर तर मी घाबरून गेलो होतो पण लोकांना सतर्क करण्यासाठी थोडा काचरत होतो कारण माझा हा फक्त एक कच्चा अंदाज होता त्यामागे काही सबळ

अभ्यास नव्हता. मी पुढच्या रिपोर्टची वाट पहात बसलो. ऑगस्ट २०१६ ला 'लिव्हिंग प्लॅनेट रिपोर्ट २०१६' प्रकाशित झाला. त्यात नोंद होती की १९७० ते २०१२ दरम्यान वन्य प्राणी जीवन ५८ टक्क्यांनी घटले आहे. मला पश्चाताप होत होता की मी दोन वर्षांपूर्वीच ही धोक्याची सूचना द्यायला हवी होती. माझा अंदाज खरा होताना दिसत होता. त्या रात्री किमायाला मी गोष्ट वाचून दाखवा होतो. लेखिका रूबी रॉथ यांची 'That's why we don't eat animals' नावाची गोष्ट होती. ह्याचा अर्थ "म्हणून आम्ही प्राणी खात नाही". गोष्ट संपल्यावर किमायाने माझ्या खांद्यावर डोकं ठेवलं आणि विचारलं, "आजोबा, या पृथ्वीवरचा सगळ्यात पहिला माणूस कोण?"

आता हा प्रश्न खूपच मार्मिक होता. ह्याच उत्तर देणं अवघड होतं. मी विचार करत होतो की आता "डार्विन चा सिद्धांत" या पाच वर्षाच्या मुलीला कसा समजावावा.

मी म्हणालो,

> "असं समाज की तू तुझ्या आईचा पकडून रस्त्याच्या एका बाजूला उभी आहेस. तू तुझ्या आईला तिच्या आईचा हात पकडून उभं राहायला सांगितलास आणि तिने तिच्या आईचा. असं करत करत एक मोठी आयांची रांग बनली"
>
> "आता रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला चिंपांझी प्राण्याला तू तसंच आपापल्या आयांचा हात पकडून उभं राहायला सांगितलंस आणि त्या बाजूला सुद्धा एक मोठी रांग तयार झाली. "
>
> "आता जेव्हा त्या रांगा मुंबई शहरापासून नाशिक पर्यंत जातील तेव्हा त्या एकमेकांमध्ये मिसळतील. दोन्ही रांगा म्हणतील 'अरे, ही तर माझी आई आहे ' "

किमाया हे ऐकून ताडकन अंथरुणावर उभी राहिली. "काय? म्हणजे चिंपांझी सारखे प्राणी माझे कुटुंब आहे?"

मी म्हंटल, "हा आता तू तसं म्हणत असशील तर तसं. हो प्राणी हे आपल्या कुटुंबाचा भाग आहेत."

तोपर्यंत मला वैज्ञानिक दृष्ट्या हा उत्क्रांतीचा सिद्धांत माहीत होता, पण त्याचा अर्थ 'प्राणी आपले कुटुंब आहे ' असा मी कधीच काढला नव्हता. 'वसुधैव कुटंबकम' हे किमायाच्या अंतरंगात आहे याची मला जाणीव झाली. तिचे डोळे मला खूप काही सांगत होते.

"मग हे सगळे माणसं माझ्या कुटुंबातल्या लोकांना का खातायत? आजोबा तुम्ही त्यांना थांबवा ना, त्यांना सांगा ना की माझ्या कुटुंबातल्या प्राण्यांना खाऊ नका"

तिला माहीत असलेल्या मांसाहारी लोकांची नावे घेऊन मला सांगू लागली की ते तिच्या कुटुंबाला खात आहेत. किमायाला नेहमीच खरं सांगेन असं मी तिला अभिवचन दिलं होतं. मला त्या वचनाची आठवण झाली पण मग मी नि:शब्द झालो. मनात म्हणालो, मीच माझ्या नातीच्या सभोवताली हे राक्षसी वृत्तीचे जग बनवले आहे. मला आतून खूप खंत वाटू लागली.

किमाया चक्क रडू लागली. तीच रडणं ऐकून माझं हृदय तीळ तीळ तूटत होतं. तिला शांत करण्यासाठी मी म्हणालो,

"किमाया, रडू नकोस बाळा. लोकांनी प्राणी खाऊ नयेत यासाठी मी प्रयत्न करतो आहे. नव्हे तेच माझं काम आहे."

रडणं थांबवून ती आश्चर्याने माझ्याकडे पाहून म्हणाली,

"काय? हे तुमचं काम आहे? तुम्ही हे काम करता ऑफिस मध्ये जाऊन? मग तुम्ही तुमचं काम नीट का नाही करत आहे?"

त्यानंतर तिने मला एक बोट दाखवलं आणि म्हणाली

"आजोबा, जा ऑफिस ला आणि तुमचं काम करा. कधी करणार तुम्ही हे काम? कधी तुम्ही सांगणार माझ्या मैत्रिणींना की प्राणी खाऊ नका म्हणून?"

मी पटकन म्हणालो,

"मला २०२६ पर्यंत माझं काम केलाच पाहिजे नाहीतर खूप मोठी पंचाईत होईल "

ती म्हणाली,

“मला प्रॉमिस करा आजोबा. मला वाचन द्या”

“हो किमाया. दिलं वचन! ”

“मग आता गट्टी फू?”

आता गट्टी फू म्हणजे काय करायचं हे मला काही माहीत नव्हतं. मी आपलं म्हणालो

“हो. गट्टी फू! ”

तिची इवलीशी करंगळी माझ्या करंगळी मध्ये अडकवून ती म्हणाली

“आजोबा, गट्टी फू कधीच तोडायची नसते हं! ”

माझ्या खांद्यावर डोकं ठेऊन ती झोपून गेली.

माझी मात्र झोप उडाली. मला जाणीव झाली की मी ह्या लहानग्या मुलीला खूप मोठं वचन देऊन बसलोय. मानव जातीच्या वतीने मी दिलेलं वचन आहे हे आणि ते पूर्ण करण्यासाठी मला अविरत प्रयत्न केले पाहिजेत. कशीबशी नंतर मला झोप लागली. दुसऱ्या दिवशी उठल्यापासून मी एक सिस्टम इंजीनियर म्हणून २०२६ पर्यंत जगाला अहिंसक (Vegan) बनवण्याची जबाबदारी घेतली.

पुढे, माझं ‘क्लाइमेट बाथटब’ मॉडेल (जे मी यूनायटेड नेशनच्या COP २६ मीटिंग, जी ग्लासगो इथे झाली, त्यासाठी बनवलं होतं); सिद्ध करत होतं की पर्यावरणाचा ह्रास टाळण्यासाठी कमीत कमी २०२६ पर्यंत जगाला अहिंसक (वीगन – सर्व पशू प्रजाती मनुष्यापासून शोषण मुक्त) व्हावेच लागेल.

एक इंजीनियर असल्यामुळे मला शक्यता काय आहे ते कळते, काय होईलच हे मी सांगू शकणार नाही. मला माहीत आहे की पर्यावरण घातक समाज बदलणे तितकेसे सोपे नाही, पण हे काम म्हणजे कॅप्टन सलेनबर्गर ह्यांच्या ‘हडसन मधील चमत्कार’ सारखं आहे. एकदा अमेरिकेच्या एका विमानाचे इंजिन कॅनेडियन हंस पक्षाच्या

धक्क्यामूळे बंद पडले. विमानाच्या कप्तान सलेनबर्गर यांनी १५५ प्रवाश्यांना होणाऱ्या परिणामांसाठी तयार राहायला सांगितले. सर्व जण सुरक्षिततेची तयारी करू लागले आणि मग सलेनबर्गर यांनी ते विमान हडसन नदीवर उतरवले. चमत्कारिक रित्या प्रवाशी वाचले.

'फ़ूड हिलर्स' तर्फे आम्ही वीगन जेवण लोकांना फुकट देतोय, त्यासाठी लोकांचे रंग, रूप, जात पहिली जात नाही. फक्त लोकांच्या मनात अन्नाद्वारे प्रेम उत्पन्न व्हावे ही माफक अपेक्षा आम्ही करतोय. पर्यावरण घातक समाज बदलण्याचा हा अगदी प्राथमिक उपचार आहे जेणेकरून कॅप्टन सलेनबर्गर सारखं आम्ही सुरक्षितपणे लोकांना हळुवार खाली आणू त्यांच्या भावना न दुखावता आणि हे करत असताना एकीकडे आम्ही पर्यावरण पूरक समाज घडवण्यासाठीचे प्रयत्न देखील चालूच ठेऊ.

विश्वास आणि कृती हे निराशा आणि उदासीनतेचे शत्रू आहेत.

अशा प्रकारे, किमायाने मला शिकवलं की मी काय करायला पाहिजे, कसं करायला पाहिजे आणि कधीपर्यंत करायला पाहिजे. माझ्यासाठी तरी तिने सहा वर्षात जेवढं भानावर आणलं तेवढं जगात कुणालाही आज पर्यंत जमलेलं नाही. तुमच्या आयुष्यातल्या 'किमाया' मुळे तुम्हाला देखील पर्यावरण घातक समाजाकडून पर्यावरण पूरक समाजाकडे जाण्यासाठी प्रेरणा मिळो ही मी प्रार्थना करतो.

मला थोडी भीती आहे पण ह्या मानवाच्या इतिहासातील अद्भुत बदलाचा भाग होण्याची मला उत्सुकता सुद्धा आहे. पुढील काही वर्षात आपण एक 'पर्यावरण सुदृढ आणि निरोगी' समाज घडवू!

कृपया आम्हाला HELP करा –

Heal the planet. (वसुंधरेला बरं वाटेल असे आचरण करा)

Eat plants. (शुद्ध शाकाहाराचे सेवन करा)

Love animals. (सर्व प्राण्यांवर नि:स्वार्थ प्रेम करा)

Plant trees. (झाडे लावा)

पाहा, इतकं सोपं आहे!

... जोपर्यंत आपण सर्व गोष्टी स्पष्टपणे पाहत नाही आणि कालबाह्य संस्कृती/रुढींच्या मागे लपणे थांबवत नाही, तोपर्यंत आपण समस्या सोडवणार नाही

- ग्लेन मझ्झर

समिक्षा

जेव्हा ब्रम्हदेव पृथ्वीवर येतात - ग्लेन मर्झर

कल्पना करा की ब्रह्मदेव आज पृथ्वीवर आले आणि त्यांनी आपल्या चुका दाखवण्यासाठी थोडा वेळ काढला तर काय होईल? समजा ब्रह्मदेव संयुक्त राष्ट्रसंघ च्या प्रमूख संख्याशास्त्रज्ञला भेटले, ज्याला सगळं माहीत आहे की आपण पृथ्वीचा वापर कसा करतोय व चुकीचं वागतोय. त्यांच्यातील संवाद बहुदा असा असेल —

ब्रह्मदेव: मी गेल्या पन्नास हजार वर्षापासून पृथ्वीवर आलेलो नाही. मला ह्या निळ्याशार आणि हरित पृथ्वीचा तसेच तुम्हा मानव जातीचा खूप अभिमान वाटतो.

तुमच्या उत्पत्तीच्या काळात तुमचा मेंदू प्रगत होत होता आणि तुम्ही अधिकाधिक बुद्धिवान बनत होतात, माझी तुमच्या कडून उत्कृष्ट निर्मितीची अपेक्षा वाढली.

पण मला नुकतेच कळले आहे की तुम्ही हरितवायूंच्या अति उत्सर्जनामुळे पृथ्वीचे तापमान अतिशय वाढवून ठेवलेले आहे. खरंय का हे ?

प्रमूख: हो, आम्ही दरवर्षी हवेत अपेक्षेपेक्षा खूप जास्त कार्बन डायऑक्साइड सोडतोय. आम्ही आता पृथ्वीच्या क्षमतेच्या उच्चतम पातळीला पोहचलो आहोत. आताचे प्रलय, वणवा आणि वादळं ही पहिल्यापेक्षा अधिक विनाशकारी आणि रौद्र असतात. काहीच दिवसात आता आम्हाला श्वास घेणं देखील कठीण होणार आहे.

ब्रह्मदेव: मला आठवते आहे त्याप्रमाणे मी सहा लक्ष कोटी झाडे लावली होती , मग कुठे आणि काय बिघडलय ?

प्रमूख: हो महाराज, सहा लक्ष-कोटी झाडे असती तर हा प्रश्नच नव्हता पण आता आमच्याकडे फक्त तीन लक्ष कोटीच झाडे आहेत.

ब्रह्मदेव: तुम्ही तीन लक्ष-कोटी झाडे नष्ट केलीत ? ती कशी काय ? कोळसा खाणींमुळे का ? मला नुकतेच कोळश्याविषयी समजले !

प्रमूख: खरं तर, कोळसा खाणींमुळे फारसा काही नाही झाला, त्यासाठी आम्ही पर्वत फोडतो आणि काही झाडं जातात, पण त्यामुळे एवढी झाडं गेली नाहीत.

ब्रह्मदेव: मग तैल खाणींमुळे? त्यामुळे झाडे नष्ट झाली का ?

प्रमुख: नाही नाही, तैल खाणी मुळे पण नसेल. त्यामुळे काही एवढी झाडे नाही नष्ट होत. काहीवेळा तेल गळती होते, मेक्सिको आखात मधे एकदा प्रचंड तेल गळती झाली होती आणि करोडो पिंप (barrels) भरून तेल पळून पाण्यात सांडले होते.

ब्रह्मदेव: तेल काय पिंपातून येतं??

प्रमुख: नाही, पण आम्ही त्याला पिंपामध्ये मोजतो. हे प्रमाण आम्हाला बरोबर वाटतं.

ब्रह्मदेव: पण ते माश्यांसाठी खुपच हानिकारक नाही का ? मला आठवते आहे मी प्रचंड प्रमाणात मासे उत्पन्न केले होते.

प्रमुख: नाही महाराज, ते उलट माश्यांसाठी चांगलं झालं. मेक्सिकोच्या आखातात जेव्हा तेल गळती झाली ना तेव्हा मासे आपोआपच पुनर्स्थापित झाले.

ब्रह्मदेव: आश्चर्य आहे. मला आठवते आहे की मी जेव्हा मस्त्य उत्पत्ती केली तेव्हा ते तेल पीत नव्हते. मेक्सिको आखातात तेल गळती झाल्यामुळे मासे परत कसे आले? मला समजले नाही.

प्रमुख: त्याच काय झालं, जेव्हा तेल गळती झाली तेव्हा आम्ही मासे पकडणे बंद केलं. त्यामुळे साहजिकच जास्त मासे पाण्यात राहिले. माश्यांना तेल चालत नाही मान्य आहे पण कदाचित त्यांना माणसांनी आपल्याला खाऊन मरण्यापेक्षा दूषित पाणी बरे वाटले असेल.

ब्रह्मदेव: थांब थांब, एक मिनिट! मला आठवतय की मी तुम्हाला म्हणजे मनुष्य प्राण्याला जंगलात रहाण्ययजोगं बनवलेलं. वानरं, गोरिला, चिंपांझी अश्या इतर वन्य प्राण्यांसारखेच मनुष्य प्राणी बनवले होते मी. वानरं पण मासे खातात?

प्रमूख: नाही, साहजिकच नाही खात.

ब्रह्मदेव: मग तुम्ही का खाता?

प्रमुख: कारण ते आमच्या खाद्य संस्कृतीचा भाग आहे.

ब्रह्मदेव: मला तर नाही आठवत कुठली संस्कृती मी निर्माण केलेली!

प्रमुख: तुम्ही नाही महाराज आम्हीच निर्माण केली.

ब्रह्मदेव: ह्या संस्कृतीच काय प्रयोजन आहे?

प्रमूख: संस्कृती म्हणजे एक पिढी कडून दुसऱ्या पिढीकडे काही गोष्टी सुपूर्त करायच्या आणि त्या परंपरा चालू ठेवायच्या मग त्या चूक असोत वा बरोबर .

ब्रम्हदेव: म्हणजे कोणत्या गोष्टी पिढ्यांपिढ्या केल्या जातात? पूर्वपरंपरेच्या कुठल्या गोष्टींचा साधारण मनुष्याला अभिमान वाटतो?

प्रमूख: ओ! जसं की संगीत, कला शिवाय काही इतर हिंसक गोष्टी जश्या गुलामी, वर्ण व्यवस्था, त्याशिवाय काही हिंसक खेळ जसं की बैलांची झुंज, प्राण्यांचे अती प्रजनन करणे आणि त्यांना मारून खाणे. महाराज, तुम्हाला आयरिश स्टेप डांसिंग विषयी काही माहीत आहे का ? फार छान असतं ते.

ब्रम्हदेव: हम्म! तर तुमच्या या स्वनिर्मित संस्कृती मुळे तुम्ही मासे खाता? त्यामुळे समुद्रावर काय परिणाम होतो मग?

प्रमुख: काही नाही, समुद्राचा ह्रास होतो.

ब्रम्हदेव: सगळ्या समुद्रांचा ह्रास ? अगदी सगळ्या? पृथ्वी वर ७०% समुद्र आहे!

प्रमुख: देवाण घेवाण आहे महाराज ! आम्ही समुद्रातून मासे घेतो पण काळजी नको, समुद्राची पातळी वाढते आहे. जागतिक तापमान वाढीमुळे समुद्राचे पाणी देखील वाढले आहे.

ब्रम्हदेव: बरं, तुमच्या आहारात किती प्रमाण आहे माश्यांचं?

प्रमूख: साधारण ३ टक्के !

ब्रम्हदेव: तुम्ही समुद्राचा ह्रास केला ते केवळ ह्या ३ टक्क्यांसाठी ? वर्षाला किती मासे मरता तुम्ही ?

प्रमुख: माझ्या माहितीनुसार एक लक्ष कोटी. आम्ही तेवढे खत नाही पण गरजेपेक्षा खूप जास्त मासे मारले जातात कारण जाळी टाकली की खूप येतात एकदम बाहेर, सगळेच काही खाऊ शकत नाही. कधी कधी हे जाळं डॉलफिन आणि देव माश्यांना सुद्धा मारते पण ते काही आम्ही खात नाही. आम्ही शेवाडं आणि खेकडे पण मारतो आणि खातो, ते मासे नाहीयेत तरी खातो. समुद्रात जे काही आहे ते सगळं आम्ही घेतो. आमच्या गायीं-म्हशींसाठी सुद्धा आम्हाला मत्स्यखाद्य लागतं.

ब्रम्हदेव: गायी-म्हशी? मी त्यांना बनवल्याचं मला आठवत नाही.

प्रमुख: हो खरंय. तुम्ही रान बैल व गुरेढोरे बनवले होते. आम्ही त्यांना पळलं, स्वभाव मावळ व अंग धष्टपुष्ट केलं, आणि मग गायी-म्हशी बनल्या. आम्ही त्यांच मऊ मांस खातो.

ब्रह्मदेव: अच्छा. किती गायी बनवल्या आहेत तुम्ही. शंभर वैगरे?

प्रमुख: नाही महाराज, साधारण एक लक्ष कोटी गायी आहेत आता. त्यांच मांस खाणं हे आमच्या संस्कृतीचा भाग आहे.

ब्रह्मदेव: एक लक्ष कोटी ??? त्यांनी पृथ्वीचा किती भाग व्यापला आहे मग?

प्रमुख: असं बघा की ३७ टक्के पृथ्वी ही गायींनी व्यापली आहे आणि साधारण ६ टक्के आम्ही त्या गुरांना चरण्यासाठी राखून ठेवली आहे.

ब्रह्मदेव: थांबा. मी बहुतेक ऐकण्यात चूक केली. पृथ्वीचा ४३% भाग हा तुम्ही गाय आणि तिच्या संगोपनासाठी वापरताय ?? ४३% ???

प्रमुख: हो बरोबर महाराज. तुम्ही अगदी बरोबर ऐकलेत. गायींच वजन साधारण ७०० किलो असतं त्यामुळे त्यांना खूप चरायला लागतं शिवाय त्यांना मस्त्याखाद्य आणि कोंबडी खत ही लागतं. शिवाय इतर ही काय काय चरत असतातच त्या.

ब्रह्मदेव: गायींना कोंबडी खत खाऊ घालता तुम्ही ?

प्रमुख: हो म्हणजे तो पुनर्वापर आहे ना.

ब्रह्मदेव: म्हणजे जी ३ लक्ष कोटी झाडे तुम्ही गमावलीत ती ह्या गुरांना ४३% भूभाग देण्यासाठी ?

प्रमूख: बरोबर. आम्हाला ३ लक्ष कोटी झाडे तोडावी लागली आणि अनेक सुपीक जमिनी वापराव्या लागल्या. तेव्हा गायींना जागा करता आली आणि त्यांच्या चारण्याची सोय करता आली.

ब्रह्मदेव: ठीके म्हणजे तुम्हाला ह्यातून तुमचा ९०% तरी आहार मिळत असेल.

प्रमुख: नाही फक्त १२%.

ब्रह्मदेव: मी बनवलेल्या ह्या पृथ्वी ग्रहाचा तुम्ही जवळ जवळ अर्धा भाग वापरताय. तुम्ही ग्रहावरील सर्व झाडे तोडली आहेत, मासे खाताय. प्राणी मारताय आणि एवढं करून तुम्ही मला सांगताय की हे सगळं करून तुम्ही तुमच्या आहाराची फक्त १२% गरज भागवू शकता यातून ?

प्रमूख: हो म्हणजे १२ % हे आणि ३% मासे म्हणजे साधारण १५%.

ब्रह्मदेव: तुम्हाला कळतय ना तुम्ही काय बोलतताय ते? हा कुठला हिशोब आहे? निर्लज्ज पणे काय सांगताय मला हे ?

प्रमूख: मला बढाया मारायला आवडत नाही पण तुम्हाला म्हणून सांगतो आम्ही ह्या अपराधीपणाच्या भावनेतून कसं बाहेर पडायचं ते शिकलोय आता. त्याला तुम्ही हव तर निर्लज्जपणा म्हणू शकता.

ब्रह्मदेव: बरं मग बाकी प्राण्यांचं काय चालू आहे? जसं की वाघ, बिबटे, जिराफ, हत्ती वैगरे ?

प्रमुख: अच्छा ते ! त्यांना पण आम्ही मारतोच आहोत. १९७० ते २०१६ च्या काळात आम्ही दोन तृतीयांश प्राणी संपवले आहेत. २०२६ पर्यंत सगळे हे इतर प्राणी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

ब्रह्मदेव: आणि तुम्ही हे सगळं तुमच्या काय म्हणालात ते; 'संस्कृती' साठी करताय ?

प्रमूख: हो कारण आमच्या संस्कृती मध्ये प्राण्यांना मारून खाण्याची पद्धत आहे. शिवाय जे प्राणी आम्ही खात नाही त्यांची आम्ही मनोरंजन म्हणून शिकार करतो.

ब्रह्मदेव: अश्या ह्या संस्कृतीला बंद करण्याविषयी तुम्ही कधी विचार केलात का ?

प्रमुख: नाही करू शकत महाराज! ह्या वेगवेगळ्या संस्कृती पाहण्यासाठी किंवा जाणण्यासाठी देशातले लोक फिरतात, प्रवास करतात. त्यांनी तो प्रवास नाही केला तर आमचा दळण वळण चा पैसा कसा येईल? लोकांना इतरांची संस्कृती कायम आकर्षक वाटते. जगातल्या जास्तीत जास्त संस्कृत्या हे गोमांस खायला सांगतात.

ब्रह्मदेव: मला आठवते आहे की मी तुम्हाला असं बनवलेलं की तुम्हाला सफरचंद पाहिलं की भूक लागायला हवी. तसं ह्या गायींना बघून तुम्हाला भूक लागते ?

प्रमुख: अजिबात नाही. गायींना बघून कुणालाच भूक लागत नाही.

ब्रह्मदेव: मग हीच तर लक्षणे आहेत की गाय हे तुमचं अन्न नाहीये.

प्रमुख: क्षमा असावी महाराज पण हे समजण्याइतकं तुम्ही मानव जातीला हुशार नाही बनवलं.

ब्रह्मदेव: हे खरच आश्चर्यकारक आहे की तुम्ही ४३% पृथ्वीचा भूभाग हा गायींसाठी वापरताय. तुम्ही म्हणता तुम्ही गायी खाता परंतू गायी बघून तुम्हाला भूक लागत नाही.

प्रमुख: आम्ही फक्त गोमांस नाही खात त्यांचं दूध पण पितो.

ब्रह्मदेव: आता मात्र तुम्ही माझी चेष्टा करताय. माणसाची बाळं गायीच दूध पितात?

प्रमूख: फक्त बाळं नाही, मोठी माणसं सुद्धा पितात.

ब्रह्मदेव: माझी चेष्टा करणं थांबवा आणि कृपया सत्य सांगा.

प्रमूख: मी चेष्टा नाही करत महाराज ! खरच मोठी माणसे गायीचं दूध पितात.

ब्रह्मदेव: म्हणजे मोठी माणसं? शरीराची पूर्ण वाढ झालेली माणसं ?

प्रमूख: हो हो मोठी माणसं. शिवाय आम्ही दुधाचे विविध पदार्थ सुधा बनवतो आणि खातो. जसं की चीज, श्रीखंड, बासुंदी.. आमच्या संस्कृतीत प्रत्येक सणाला दूध आणि दुधाचे पदार्थ असतातच.

ब्रह्मदेव: तुमच्याकडे शिक्षेला महत्त्व आहे का ? शाळा, विद्यालय आहेत ?

प्रमूख: हो आहेत ना. आम्ही मुलांना शाळेत संस्कृतीचे पूर्ण ज्ञान देतो.

ब्रह्मदेव: वाह ! म्हणजे तुम्ही मुलांना हे शिकवता की गाय खायची असते आणि गायीच दूध प्यायच असतं. बरोबर ना ? हेच शिकवता ना ?

प्रमूख: हो , अगदी बरोबर ओळखलत तुम्ही.

ब्रह्मदेव: पण एवढी ७०० किलो वजनाची गाय खाऊन आणि तीच दूध पिऊन तुम्ही देखील ७०० किलो चे होता की काय ? तुम्हाला एवढं पचतं ? इतकं तर सिंहाला किंवा वाघाला सुद्धा पचत नाही.

प्रमुख: हे अर्धा सत्य ऐकलात तुम्ही महाराज. पूर्ण सत्य हे आहे की आम्ही असं गायी खातो, किंवा तिचे दूध पितो, जे आम्हाला पचत नाही त्यामुळे आजार उद्भवतात. मग आम्ही डॉक्टर कडे जातो आणि खूप पैसे खर्च करतो. माणसाच्या दुर्धर रोगांवर पैसे कमावणाऱ्या खूप साऱ्या कंपनी इथे आहेत.

ब्रह्मदेव: अरे मग असं रोगी अन्न तुम्ही का खाताय ?

प्रमूख: मी सांगितलं ना महाराज तुम्हाला..संस्कृ...

ब्रह्मदेव: संस्कृती! हो कळलं.

प्रमुख: बरोब्बर!

ब्रह्मदेव: मला आठवते त्या प्रमाणे मागच्या वेळी मी पृथ्वीवर आलो होतो तेव्हा मला आनंद झालेला की माणसाचा मेंदू इतर चिंपांझी आणि गोरिल्ला पेक्षा अधिक सुधारतो आहे.

प्रमुख: हो माणूस 'संस्कृती' निर्माण करण्याइतका बुद्धिवान झाला आहे पण त्या 'संस्कृती' मधले दोष जाणून ते सुधारण्याइतका नाही. माणूस चूक आणि बरोबर च्या मधे फसला आहे.

ब्रह्मदेव: आणि आता पृथ्वीचे तापमान सुधा वाढले आहे.

प्रमुख: हो ना.

ब्रह्मदेव: तुम्ही एकमेकांना अफवा सांगत आहात की जागतिक तापमानवाढ ही इंधन, खनिज, तेल ह्यांच्या वापरामुळे झाली आहे पण खरे कारण तर हे आहे की तुम्ही तुमच्या मूलभूत गरजांपेकी एक गरज म्हणजे ' अन्न' मिळवण्यासाठी आणि तेही फक्त १२% गरज भागवण्यासाठी जगातील सर्व समुद्रांची वाट लावलीत, शिवाय ३ लक्ष कोटी झाडे संपवलीत.

प्रमुख: हो कारण इंधन किंवा खनिज उत्पादन हा..

ब्रह्मदेव: तुमच्या संस्कृतीचा भाग नाही.

प्रमुख: हो म्हणजे, आमच्या संस्कृतीत इंधन किंवा तेल किती आहे कुणाकडे हे पाहून कुणी त्याची योग्यता ठरवत नाहीत. तर खाद्य संस्कृती कशी आहे ह्यावरून देशाची प्रसिद्धी होते सगळीकडे. आम्ही खाद्यसंस्कृतीतला दोष नाही दाखवू शकत. कारण ती आम्हीच निर्माण केली आहे.

ब्रह्मदेव: खाद्यसंकृतीला फार महत्त्व आहे तर.

प्रमुख: हो नक्कीच. आणि त्यावर आक्षेप घेता येत नाही.

ब्रह्मदेव: तुमच्याकडे गरिबी, गुलामगिरी, वर्णव्यवस्था अजून आहेत का?

प्रमुख: ह्या गोष्टी नष्ट करण्याचा आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करतोय. त्या चुकीच्या आहेत आणि संपल्याच पाहिजेत.

ब्रह्मदेव: मग खाद्य संस्कृतीतल्या चुकीच्या गोष्टी का नाही बदलत ? मला वाचन द्या की तुम्ही प्राणी खाणं लवकरात लवकर बंद कराल आणि ह्या पृथ्वीचा ४३% भाग तिला परत कराल. मी माणसाला इतर प्राणी खाण्यासाठी नाही बनवलं. किंवा माणूस इतर प्राण्यांचे दूध नाही पिऊ शकत किंवा पचवू शकत. तसा निसर्गाचा नियमच आहे. लवकरात लवकर स्वतःमध्ये बदल करा.

प्रमुख: बदल फार कठीण आहे महाराज. खूप वेळ लागेल खाद्य संस्कृती बदलायला.

ब्रह्मदेव: पण तुमच्या कडे जास्त वेळ नाहीच आहे. अर्ध्या पृथ्वीचा समतोल तुम्ही बिघडवलाय हे लक्षात आहे ना ? सत्य सर्वांना कळू द्या, संस्कृतीच्या मागे लपणं बंद करा. ही समस्या सोडवणं माणसाच्या अस्तित्वासाठी अत्यंत गरजेचं आहे.

माझा आदेश आहे की, ह्या पृथ्वीला पुन्हा मी जशी बनवलेली तसं बनवा. प्राणी आणि झाडं हे पृथ्वीचं सौंदर्य आणि श्वास आहेत. गायी बनवणं आणि गायी खाणं बंद करा ताबडतोब. तुम्ही निर्माण केलेल्या संस्कृतीतले दोष बघा आणि ते सुधारा. तुमच्या इतर प्राणी बांधवांसारखे तुम्ही वनस्पतीजन्य पदार्थ खा, गोमांस खाऊ नका. ते अनैसर्गिक आहे. गायीच दूध पिणे तर अजूनच अनैसर्गिक आहे.

हे सर्व २०२६ पर्यंत बदलले पाहिजे , नाहीतर पृथ्वीचा सर्वनाश अटळ आहे. मला पृथ्वीला नष्ट करायचे नाहीये आणि तुमच्या ह्या समस्या देखील मी सोडवू शकत नाही, त्या तुमच्या तुम्हालाच सोडवायला हव्यात.

पृथ्वीला वाचवा!

बोला, जमेल ?

गट्टी फू ?

प्रमूख: गट्टी फू!

तर ब्रह्मदेवाने काही मिनिटांच्या संवादातून ओळखले की इंधन किंवा इतर सांगितली जाणारी कोणतीही कारणं पर्यावरणाच्या ह्या अधोगतीसाठी अंशतः कारणीभूत आहेत तर केवळ आपली खाद्यसंस्कृती पूर्णतः कारणीभूत आहे. आपण समुद्राचा समतोल बिघडवला, आपण जमिनीचा समतोल बिघडवला निव्वळ गोमांस खाता यावे आणि गायीचे दूध पिता यावे म्हणून. शिवाय गोमांस आणि गायीचे दूध हे आपले नैसर्गिक अन्न नाही.

थोडक्यात आपण मूळ समस्या सोडून संस्कृतीच्या मागे लपत राहिलो तर आपण कधीही ह्या पृथ्वीला वाचवू शकणार नाही. आपल्या भावी पिढ्यांचे आयुष्य आपण धोक्यात घालतो आहे.

आपला विश्वासू,

ग्लेन मर्झर

आभार

ह्या पुस्तकाच्या निर्मितीत अनेक जणांचा सहभाग आहे. सुझन अश्ले किंग हिचा मी आभारी आहे कारण तिने ह्या पुस्तकाला सुंदर आकार दिला आहे. माझ्या बाळबोध कवितेला अर्थ दिल्याबद्दल विविएन चिलेली चा मी आभारी आहे. पुस्तकाच्या शेवटी एक सुंदर एकपात्री प्रयोग लिहल्याबद्दल ग्लेन मर्झर ह्यांचा मी आभारी आहे. प्रस्तावना दिल्याबद्दल जुडी माकोय कार्मन आणि सुझन मॅकलिस्टर तसेच एन पायोट्रोव्स्की ह्यांनी मला हे पुस्तक लिहण्यासाठी प्रोत्साहन दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझी बायको जैनी राव हिचा मी आभारी आहे कारण ती सतत आमच्या कुटुंबाला सांभाळून आहे. अखिल राव, डॉली व्यास-आहुजा आणि परवीन सचदेव ह्यांचा मी आभारी आहे कारण हे पुस्तक लिहताना भारत दौऱ्यामध्ये त्यांनी मला मोलाची साथ दिली. भारत देशातल्या गुजरात राज्यातील सुरत येथील त्या हॉटेलचा सुद्धा मी ऋणी आहे कारण तिथे शांतपणे मला लिहता आले . ह्याऊपर मी माझ्या नातीचा म्हणजे किमायाचा ऋणी आहे जिने मला ह्या गोष्टींकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन दिला.

मी प्रार्थना करतो की किमायाची पिढी ह्या माझ्या पिढीला माफ करेल कारण संस्कृतीतील दोष जाणून घेऊन त्यावर उपाय करण्यात आम्ही जरा उशीरच केला आहे.

"**गट्टी फू – 'The Pinky Promise'** ही एका लहान मुलीने तिच्या आजोबांचे आयुष्य कसे बदलले आणि त्यांना क्लायमेट हीलर्समधील त्यांच्या कारकिर्दीच्या मार्गावर कसे मार्गदर्शन केले याची हृदयस्पर्शी कथा आहे, ज्याचे ध्येय मानवतेला दयाळू, पर्यावरणाशी सुसंगत, व काळजी घेणाऱ्या अशा "होमो अहिंसा" प्रजातीत रूपांतर करणे आहे."

"हे पुस्तक खरोखरच एक अशी पवित्र आणि शक्तिशाली प्रार्थना आहे जी आपल्या सोबत येऊन उभी राहते, आणि एक चांगली वाट सापडते. "

- ज्युडी मॅकॉय कारमन, लेखिका
होमो अहिंसा: हू वी रियली आर एंड हाऊ वी आर गोइंग टू सेव्ह द वर्ल्ड, आणि
पीस टू ऑल बींग्स: वेजी सूप फॉर द चिकन्स सौल

"हे पुस्तक दाखवून देतं की मोठ्यांनी ही पाटी कोरी करून शिकलं, तर सध्याच्या पर्यावरणीय आपत्तीवरील उपाय लहान मुलांना ही समजतील इतके सोपे आहेत."

- कीगन कुहन,
काउस्पायरेसी आणि व्हॉट द हेल्थचे सह-संचालक

"पर्यावरण बदलाचे सत्य कळताच अत्यंत असहाय्यतेची भावना निर्माण होते. परंतु गट्टी फू – 'The Pinky Promise' हे पुस्तक आपल्याला आशेचा किरण दाखवते व आपल्यातील निरागसता, माणुसकी आणि ताकद शोधायला मदत करते, जे आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे."

- जॉन आणि ओशियन रॉबिन्स,
फूड रेवलूशन नेटवर्क चे संस्थापक आणि प्रमुख

climate
healers.
org

ISBN 979-8-89686-673-2
9 798896 866732